श्रीश्री गुरु-गौरांगौ जयतः

# श्री हरिनाम महामंत्र

[महामंत्राचा क्रम, ऐश्वर्य आणि माधुर्यमयी व्याख्या, हरिनामाचा महिमा, हरिनाम ग्रहण करण्याची प्रणाली आणि हरिनामात अपराधांचा विचार समन्वित]

श्री गौडीय वेदांत समिति आणि तदन्तर्गत भारतव्यापी श्रीगौडीय मठांचे प्रतिष्ठाता
श्रीकृष्णचैतन्याम्नाय दशमाधस्तनवर श्रीगौडीयाचार्यकेशरी
**ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशतश्री श्रीमद्भक्ति तप्रज्ञानकेशव गोस्वामीचरणाचे**
अनुगृहीत
**त्रिदंडिस्वामी श्रीमद्भक्ति तेदांत नारायण महाराज**
द्वारा संग्रहीत एवं सम्पादित

(सर्वाधिकार सुरक्षित)

Published by - Bhakti University, LLC, Harrisburg, PA
with permission from GVP
Financial help from Srimati Chandramukhi Devi Dasi, Hawaii, USA
DTP help from Atul Chandra Goel, Shahdra, Delhi, India, Mob. 9968232341

**प्रकाशक-**

**श्रीमान भक्ति तेदांत दंडी महाराज**
श्री रंगनाथ गौडीय मठ, नृत्य-ग्रामाजवळ,
हेसेरघट्टा, बंगलोर-५६००८८
दूरवाणीः (०८०) २८४६६७६०
मोबाईलः ९९००८८५२४१



**मराठी अनुवादः**
श्रील गदाधर पण्डित आणि श्रील भक्ति तविनोद ठाकूर यांचा तिरोभाव,
श्रीगुण्डिचा मंदिर मार्जन, श्री गौराब्द ५२२
३ जुलाई, २००८

इ-पत्रः bvdandi@gmail.com
vishnudaivata@gmail.com

वेब-साईटः http://www.purebhakti.com
http://www.rangagaudiya.com
http://www.bhaktistudies.com
http://www.purebhakti.tv

# श्रीहरिनाम महामंत्र

**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे**

वेद, उपनिषद, पुराण आणि संहिता इत्यादि सात्वत-शास्त्रांच्या अनुसार कलियुगाचा महामंत्र तथा तारक ब्रह्म नाम आहे - " हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे राम हरे राम राम राम हरे हरे ॥" या सोळा हरिनामात्मक महामंत्राचे संकीर्तन कलियुगाचा मुख्य धर्म आहे. भगवंतांचे 'नाम' साक्षात भगवत स्वरूपच आहे. भगवान श्री कृष्णांनी आपल्या स्वरूपाचे पूर्ण मधुर रूप, समस्त गुण, मधुर लीला आणि कृपा इत्यादि समस्त शक्ति तंनाया नावांत पूर्णरूपाने भरून ठेवले आहे. यद्यपि भगवन् 'नाम' आणि भगवत् स्वरूप'नामी' हे सर्वथा अभिन्न आहेत, त्यांच्यात काही भेद नाही आहे, तथापि काही-काही विषयात नामी-ब्रह्मापेक्षा नाम-ब्रह्माची कृपा अधिक सांगितली जाते. स्वयं-भगवान श्रीकृष्णच मायाबध्द जीवांचा उध्दार करण्यासाठी आपल्या अहैतुकी कृपेने 'नामाच्या' रूपात अवतीर्ण झाले आहेत. म्हणून सौभाग्यवान जन श्रीहरिनाम परायण सद् गुरुच्या द्वोरश्रीहरिनाम महामंत्राची दीक्षा ग्रहण करून त्याचे संकीर्तन, संख्यापूर्वक कीर्तन, उपांशु जप आणि स्मरण इत्यादिच्या द्वारा भगवद् आराधना करतात. शास्त्रांच्या अनुसार कलियुगात नाम-स्मरण अथवा उपांशु-जपापेक्षा उच्च स्वराने नामसंकीर्तनाची महिमा अधिक सांगितली आहे.

**जपतो हरिनामनि स्थाने शतगुणाधिकः।**
**आत्मानञ्च पुनात्युच्चैर्जपन् श्रोतृन पुनाति च॥**

(श्रीनारदीय, प्रल्हाद वाक्य)

हरिनाम जप-परायण व्यक्ति तेक्षा उच्चस्वराने हरिनाम-कीर्तनकारी शंभरपट श्रेष्ठ आहे, ही गोष्ट संपूर्ण ठीक आहे, कारण जप करणारा व्यक्ति त आपल्यालाच पवित्र करतो, परंतु उच्चस्वराने नाम कीर्तनकारी स्वतःला आणि सोबतच श्रोत्यांना पण पवित्र करतो. पशु-पक्षी, कीटक-पतंग, वृक्ष, लता, गुल्म पण, जे बोलू शकत नाहीत, ते पण हरिनामाचे श्रवण करून भगसागराच्या पार जातात.



म्हणून कलिकाळात सोळा हरिनामात्मक महामंत्राचे संकीर्तनच समस्त साधनांचे शिरोमणि आहे. कलियुग-पावनावतारी श्री चैतन्य-महाप्रभुनी सदा-सर्वदा श्री हरिनाम संकीर्तन करण्याचा उपदेश दिला आहे - "कीर्तनीयः सदा हरिः॥" बृहन्नारदीय पुराणात जोर देऊन सांगितले आहे-

**हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नामैव केवलम्।**
**कलौ नास्तेव नास्तेव नास्तेव गतिरन्यथा॥**

# महामंत्राचा क्रम

काही लोकांचे म्हणणे आहे की महामंत्र "हरे राम" पासून आरंभ करायला हवा. त्यांच्या युक् त्याअशा आहेत - (१) वेंकटेश प्रेस मुंबईहून छापलेल्या कलिसंतरणोपनिषदात हा महामंत्र 'हरे राम हरे राम राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे॥' असा छापला आहे. (२) ' कल्याण' गोरखपुरमध्ये पण असाच क्रम दिसतो. (३) त्रेतायुगामध्ये श्रीरामांचा आणि नंतर द्वापरयुगामध्ये श्रीकृष्णाचा आविर्भाव झाल्यामुळे प्रथम 'हरे राम' आणि नंतर 'हरे कृष्ण' असणेच युक्ति तसंगतआहे.

वर सांगितलेल्या शंका अथवा युक् त्यासंपूर्णपणे निराधार आहेत. वेंकटेश प्रेस मुंबईच्या छापलेल्या कलिसंतरणोपनिषदाच्या पूर्वीच्या संस्करणात हा महामंत्र 'हरे कृष्ण' पासूनच प्रारंभ केलेला दिसतो. कलकत्याच्या आणि जयपुरच्या जुन्या पुस्तकालयांत हे ग्रंथ सुरक्षित आहेत.

दूसरी गोष्ट गोरखपूर गीताप्रेसातून प्रकाशित कल्याण या विषयात प्रामाणिक आधार नाही आहे. तिसरी गोष्ट त्रेतायुग आधी आहे आणि द्वापरयुग नंतर आहे, या क्रमाचा प्रभाव या सनातन नित्य महामंत्रावर पडत नाही. हा महामंत्र युगातीत अथवा कालातीत आहे.

या विषयाला प्रत्येक युगाच्या तारक ब्रम्ह-महामंत्रांच्या द्वारे समजू जाऊ शकते. अनंत संहितेत पण याचा उल्लेख मिळतो -

सत्यायुगाचा - **नारायण-परावेदाः नारायण पराक्षराः।**
**नारायण परामुक्ति त नारायण परागतिः॥**

त्रेतायुगाचा - **रामनारायणानन्त मुकुन्द मधुसूदन।**
**कृष्ण केशव कंसारे हरे वैकुण्ठ वामन॥**

द्वापरयुगाचा - **हरे मुरारे मधुकैटभारे गोपाल गोविन्द मुकुन्द शौरे।**
**यज्ञेश नारायण कृष्ण विष्णो निराश्रयं मां जगदीश रक्ष॥**

कलियुगाचा - **हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥**
**षोडशैतानि नामानि द्वात्रिंशद् वर्णकानि हि।**
**कलौयुगे महामंत्रः सम्मतोजीवतारणे॥**

(अनंत संहिता)

अर्थात श्रीकृष्णावताराच्या पूर्वी त्रेतायुगाच्या तारक ब्रह्म नाम-मंत्रात पण मुकुंद, मधुसूदन, कृष्ण, केशव, कंसारि हे कृष्णनाम पाहायला मिळतात. म्हणून प्रस्तुत महामंत्राच्या क्रमात परिवर्तन करण्यात कोणताही तर्क अथवा युक्ि त उचित नाही.

अनंत-संहितेच्या या श्लोकात स्पष्टरूपाने याचा निर्देश दिला गेला आहे की कलिसंतरण आदि उपनिषदांत, महामंत्रात "हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥" हा क्रम लिहिलेला आहे. दूसरी गोष्ट, हा महामंत्र गुरुपरंपरेत श्रीनारदांनी आपल्या गुरु श्रीब्रह्मांकडून प्राप्त केला. हा नियम श्रीब्रह्म-माध्व-गौडीय-वैष्णव परंपरेत आज पण प्रचलित आहे. इतर संप्रदायांत हा महामंत्र गुरुपरंपरेत प्राप्त होत नाही. म्हणून याचे रहस्य व क्रम इतर संप्रदायात प्राप्त होत नाही. म्हणून या क्रमाला परिवर्तन करून हरे रामापासूनचे याचा प्रारंभ केला तर त्यात काही आश्‍ चर्यनाही.

विभिन्न प्रामाणिक शास्त्रांत या महामंत्राचे स्वरूप ज्या प्रकारे निर्दिष्ट केले आहे, त्यांच्यां प्रमाणांचा खाली उल्लेख केलेला आहे-

ज्ञानामृतसारमध्ये सांगितले आहे की-

**'शिष्यस्योदङ् मुखस्थस्य हरेर्नामानि षोडश ।**
**संश्राव्यैव ततो दद्यान्मंत्रं त्रैलौक्यमंगलम् ॥'**

उत्तरेकडे मुख करून बसलेल्या शिष्याच्या उजव्या कानात, श्रीहरिच्या 'हरे कृष्ण' इत्यादि सोळा नामांना प्रदान (श्रवण करवून) करूनच, गुरुदेवानी



शिष्याला, त्रैलोक्य-मंगलकारक 'गोपालमंत्राची' दीक्षा द्यावी.

ब्रह्मयामल नामक ग्रंथात श्रीशिवांच्या वाक्यात, ' महामंत्राचे' स्वरूप या प्रमाणे लिहिलेले आहे -

**"हरिं विना नास्ति किञ्चित् पापनिस्तारकं कलौ।**
**तस्माल्लोकोध्दारणार्थं हरिनाम प्रकाशयेत्॥**
**सर्वत्र मुच्यते लोको महापापात् कलौ युगे॥**
**हरेकृष्णपदद्वन्द्वं कृष्णेति च पदद्वयम्।**
**तथा हरेपदद्वन्द्वं हरेराम इति द्वयम्॥**
**तदन्ते च महादेवि! राम राम द्वयं वदेत्।**
**हरे हरे ततो ब्रूयाद् हरिनाम समुध्दरेत्॥**
**महामंत्रं च कृष्णस्य सर्वपापप्रणाशकमिति॥'**

हे महादेवि! पहा, कलियुगात श्रीहरिनामाशिवाय इतर कोणतेही साधन, सरळपणे पापांपासून सुटकारा देऊ शकत नाही, म्हणून सर्वसाधारण लोकांचा उध्दार करण्यासाठी, श्रीहरिनामालाच प्रकाशित करणे आवश्यक आहे. कलियुगात 'महामंत्राचे' संकीर्तन केल्याने सर्व लोक महापातकांतून सहजच विमुक् त होऊ शकतात. ' महामंत्रात' प्रथम 'हरे कृष्ण' 'हरे कृष्ण' हे दोन पद म्हणावे. त्या पश्‍ चा चात 'हरे राम' 'हरे राम' हे दोन पद आणि 'राम' 'राम' हे दोन पद, तदनन्तर 'हरे' 'हरे' हे दोन पद म्हणून, सर्वपापविनाशक श्रीकृष्णाच्या 'महामंत्राचे' संकीर्तन, उच्चारण, जप करावे.

राधातंत्रातपण सांगितले आहे-

**"श्रृणु मातर्महामाये! विश्व-बीज-स्वरूपिणि!।**
**हरिनाम्नो महामाये! क्रमं वद सुरेश्वरि!॥"**

कोणी भक् तप्रार्थना करतो आहे की हे विश्वबीजस्वरूपिणि! सुरेश्वरी! महामाये! माते! माझी प्रार्थना ऐका. कृपया श्री हरिनाम 'महामंत्राचा' क्रम मला सांगा.

देवीने त्या भक् ताला महामंत्राचाक्रम या प्रकारे सांगितला आहे -

**"हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥**
**द्वात्रिंशदक्षराण्येव कलौ नामानि सर्वदम्।**
**एतन्मंत्रं सुतश्रेष्ठ! प्रथमं श्रृणुयान्नरः॥"**

हे पुत्रश्रेष्ठ! सर्वसिध्दिप्रद 'हरे कृष्ण हरे कृष्ण' इत्यादि सोळा नाम, बत्तीस अक्षराच्या श्रीकृष्णनामालाच कलियुगात 'महामंत्र' म्हटलेले आहे. म्हणून स्वतःचे कल्याण इच्छिणाऱ्या मनुष्याला श्रीगुरुदेवांच्या द्वारे, प्रथम त्याचेच श्रवण करवावे.

तेथेच राधातंत्रात त्रिपुरादेवीने पण असाच निर्देश दिला आहे-

**"हरिनाम्ना विना पुत्र! दीक्षा च विफला भवेत्।**
**गुरुदेवमुखाच्छ्रुत्वा हरिनाम पराक्षरम्॥**
**ब्राह्मण-क्षत्र-विट्-शूद्राः श्रुत्वा नाम पराक्षरम्।**
**दीक्षां कुर्युः सुतश्रेष्ठ! महाविद्यासु-सुन्दर!॥'**

हे पुत्रश्रेष्ठ! तुम्ही महाविद्यांच्या ज्ञानात पारंगत आहात. पहा! गुरुच्या मुखातून 'हरे कृष्ण' इत्यादि हरिनामात्मक 'महामंत्र' श्रवण केल्याशिवाय, श्रीगोपालमंत्र इत्यादिंची दीक्षा निष्फळ होते, म्हणून ब्राम्हण-क्षत्रिय इत्यादि चारीही वर्णांच्या व्यक्तिंना श्रीगुरुदेवांच्या मुखातून 'महामंत्राला' श्रवण (ग्रहण) करूनच, श्रीगोपालमंत्र इत्यादि मंत्रात दीक्षा ग्रहण करायला हवी.

पद्मपुराणात पण सांगितले आहे की

**"द्वात्रिंशदक्षरं मंत्रं नामषोडशकान्वितम्।**
**प्रजपन् वैष्णवो नित्यं राधाकृष्णस्थलं लभेत्॥"**

सोळा नामांनी युक्त बत्तीस अक्षराच्या 'हरे कृष्ण' इत्यादि 'महामंत्राचा' नित्य जप करणारे वैष्णव, श्रीराधाकृष्णाच्या गोलोक-वृंदावनधामाला प्राप्त करतात.

पहा, ब्रह्मांडपुराणाच्या राधाहृदयखण्डात, श्रीवेदव्यासांच्या प्रति रोमहर्षणसूतांची प्रार्थना अशी आहे-

**"यत्वया कीर्तितं नाथ! हरिनामेति संज्ञितम्।**
**मंत्रं ब्रह्मपदं सिध्दिकरं तद् वद नो विभो!॥"**

हे विभो! हे प्रभो! आपण श्रीहरिनामात्मक ब्रह्मस्वरूप व सिध्दिप्रद जो मंत्र सांगितला आहे, त्याच्या स्वरूपाबद्दल मला उपदेश द्या.

याच्या उत्तरात श्रीवेदव्यासजीनी या प्रकारे उपदेश दिला-

**"ग्रहणाद् यस्य मन्त्रस्य देही ब्रह्ममयो भवेत्।**
**सद्यः पूतः सुरापोऽपि सर्वसिध्दियुतो भवेत्।**
**तदहं तेऽभिधास्यामि महाभागवतो ह्यसि॥**
**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।**



**हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥**
**इति षोडशकं नाम्नां त्रिकालकल्मषापहम् ।**
**नातः परतरोपायः सर्ववेदेषु विद्यते॥'**

पहा पुत्रा! ज्या मंत्राच्या उच्चारणाने देहधारी प्राणी ब्रह्ममय होतो, आणि मद्यपान करणारा व्यक्तिही तत्काल पवित्र होऊन सर्व सिध्दिंद्वारे युक्त होऊन जातो, त्या महामंत्राचा उपदेश मी तुम्हाला अवश्य प्रदान करीन; कारण तुम्ही योग्यपात्र महाभागवत आहात. पहा! 'हरे कृष्ण' इत्यादि सोळा नावांचा महामंत्र, त्रैकालिक-पापांना विनष्ट करणारा आहे. चारी वेदांमध्ये या महामंत्राशिवाय, संसार पार होण्यासाठी, कोणताही श्रेष्ठ उपाय सांगितला नाही आहे.

अनंत-संहितेत पण सांगितले आहे की-

**"हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे**
**षोडशैतानि नामानि द्वात्रिंशद्वर्णकाणि हि।**
**कलौ युगे महामंत्रः सम्मतो जीवतारणे॥**
**उत्सृज्यैतान्महामंत्रं ये त्वन्यत् कल्पितं पदम्।**
**महानामेति गायन्ति ते शास्त्रगुरुलङ्घिनः॥"**

'हरे कृष्ण हरे कृष्ण' इत्यादि बत्तीस वर्णांचे सोळा नामच, कलियुगात जीवांच्या उध्दारासाठी सर्वलोकशास्त्रसम्मत 'महामंत्राच्या' नावाने विख्यात आहे. म्हणून जे लोक या महामंत्राला सोडून, आपल्या अथवा दूसऱ्यांच्याद्वारे कल्पित कोण्या दूसऱ्या पदाला महामंत्राच्या नावाने कीर्तन करतात, ते लोक शास्त्र तथा गुरुजनांचे उल्लघंन करणारे आहेत. जर कोणी विचारेल की 'हरे कृष्ण' इत्यादि सोळा नामांच्या मंत्रालाच 'महामंत्र' का म्हणतात, तर याचे उत्तर हे आहे की भगवान श्रीकृष्णांच्या समस्त नामांत 'हरि'-नामाच्या समान आसन्न पाप, संकट, अविद्या इत्यादिना हरण करणारे, 'कृष्ण'- नामाच्या समान प्रेम देणारे आणि 'राम' नामाच्या समान मुक्तिदाता(भव-तारक) दूसरे नाव नाही आहे. या महामंत्रात या तीन मुख्य नावांचा समावेश आहे. दूसरी गोष्ट ही आहे की हे सोळा नाव संबोधनात्मक आहेत, त्यांत नमः, ॐ, क्लीं, स्वाहा इत्यादि पदांचा समावेश नसल्याने त्याला महामंत्र म्हणतात.

सनत्कुमारसंहितेतपण सांगितले आहे की -

**"हरे कृष्णौ द्विरावृत्तौ कृष्ण तादृक् तथा हरे।**
**हरे राम तथा राम तथा तादृक् हरे पुनः॥**
**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥"**

अर्थात प्रथम 'हरे कृष्ण' दोन वेळा, पुनः ' कृष्ण' दोन वेळा, तदनंतर 'हरे' दोन वेळा म्हणावे; तदनंतर 'हरे राम' दोन वेळा, पुनः ' राम' दोन वेळा आणि तदनंतर 'हरे' दोन वेळा म्हणावे. असे केल्याने महामंत्र झाला - हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥

पहा यजुर्वेदीय-कलिसंतरणोपनिषदात पण महामंत्राचे स्वरूप आणि माहात्म्य या प्रकारे सांगितले आहे -

**"हरिः ॐ॥ द्वापरान्ते नारदो ब्रह्माणं जगाम, कथं भगवन्! गां पर्यटन् कलिं सन्तरेयमिति। स होवाच ब्रह्मा साधु पृष्टोऽस्मि सर्वश्रुतिरहस्यं गोप्यं तच्छृणु येन कलिसंसारं तरिष्यसि। भगवत आदिपुरुषस्य नारायणस्य नामोच्चारणमात्रेण निर्धूत-कलिर्भवति। नारदः पुनः पप्रच्छ। तन्नाम किमिति? स होवाच हिरण्यगर्भः - " हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥" इति षोडशकं नाम्नां कलिकल्मषनाशनम्। नातः परतरोपायः सर्ववेदेषु दृश्यते॥ इति षोडशकलावृतस्य जीवस्य आवरणविनाशनम्। ततः प्रकाशते परंब्रह्म मेघापाये रविरश्मिमण्डलीवेति। पुनर्नारदः पप्रच्छ। भगवन्! कोऽस्य विधिरिति? स होवाच नास्य विधिरिति। सर्वदा शुचिरशुचिर्वा पठन् ब्रह्मणः सलोकतां समीपतां सरूपतां सायुज्यतामेति।"**

द्वापरच्या शेवटी नारदजी श्रीब्रम्हाजींच्या निकट गेले आणि प्रणाम करून म्हणाले कि भगवन्! भूतलावर भ्रमण करीत मी कळिकाळाला कसा पार करू शकेन? ब्रम्हा म्हणाले - हे पुत्र! फार छान प्रश्न केला. सर्व वेदांचे गोपनीय रहस्य आहे त्याला ऐक, ज्याच्या द्वारे कलिरूप-संसारातून अनायासच पार होशील. आदिपुरुष भगवान श्रीमन् नारायणाच्या(कृष्णाच्या) नामोच्चारणानेच, कलियुग विशेष करून कापायला लागते. नारदांनी परत विचारले की ते नाव कोणते? त्याचे स्वरूप काय? याच्या उत्तरात ब्रम्हाजी म्हणाले की - ' हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥ अशा प्रकारे सोळा नावांचा हा जो 'महामंत्र' आहे, तो कलिच्या कल्मषांचे संपूर्णरूपाने विनष्ट करणारा



आहे. सर्व वेदांत याच्या पेक्षा श्रेष्ठ आणि इतर कोणतेही साधन दिसत नाही. हा मंत्र षोडशकलांद्वारे आवृत्त अर्थात पंचभूत आणि अकरा इंद्रियांच्या आवरणांनी युक्तजीवाच्या आवरणांना विनष्ट करणारा आहे. त्या पश्चात तो जीवाच्या समोर, परब्रह्म या प्रकारे प्रकाशित करते जसे ढगांच्या विनष्ट झाल्यानंतर सूर्यांच्या किरणांचा समुदाय प्रकाशित होतो. नारदांनी परत विचारले की भगवान्! या महामंत्राच्या जपाची काय विधी आहे? ब्रम्हाजी म्हणाले - याच्या जपाची कोणतीही विधी नाही आहे. पवित्र अथवा अपवित्र कोणत्याही अवस्थेत कोणीही व्यक्ति या महामंत्राचे स्पष्ट उच्चारण करत, ब्रह्मसोबत सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यतेला आनुषंगिकरूपाने प्राप्त करू शकतो. केवळ इतकेच नाही; परंतु मुख्यरुपाने तर पंचम पुरुषार्थ श्रीकृष्णप्रेमापर्यंत प्राप्त करू शकतो. (चैतन्य चरितामृत आदि ७/८३-८६; मध्य २५/१४७, १९२; अंत्य ३/१७७; अंत्य ७/१०४; अंत्य २०/११).

श्रीभक्ति तंद्रिकेच्या सप्तम पटलात सांगितले आहे की -

**अथ मंत्रवरं वक्ष्ये द्वात्रिंशदक्षराऽन्वितम्।**
**सर्वपापप्रशमनं सर्वदुर्वासनाऽनलम् ॥**
**चतुवर्गप्रदं सौम्यं भक्ति तंदप्रेमपूर्वकम्।**
**दुर्बुध्दिहरणं शुध्दसत्वबुध्दिप्रदायकम्॥**
**सर्वाराध्यं सर्वसेव्यं सर्वेषां कामपूरकम्।**
**सर्वाधिकारसंयुक्तंसर्वलोकैकबान्धवम्॥**
**सर्वाकर्षणसंयुक्तंदुष्टव्याधिविनाशनम्।**
**दीक्षाविधिविहीनं च कालाकालविवर्जितम्।**
**वाङ्मात्रेणार्चितं बाह्यपूजाविध्यनपेक्षकम्।**
**जिह्वास्पर्शनमात्रेण सर्वेषां फलदायकम्।**
**देशकालाऽनियमितं सर्ववादिसुसम्मतम्॥१॥**

हा 'महामंत्र' बत्तीस अक्षरांनी युक्तआहे; समस्त पापांचा नाशक आहे, सर्व प्रकारच्या दुर्वासनांना जाळण्यासाठी अग्निस्वरूप आहे, धर्म-अर्थ-काम देणारा आहे, सुंदर स्वरूपाचा आहे, प्रेमलक्षणाभक्ति देणारा अहे, दुर्बुध्दिला हरणारा आहे, शुध्दसत्वस्वरूप भगवद्-वृत्तियुक्तबुध्दिला देणारा आहे, सर्वांचा आराधनीय सेवनीय आहे, सर्वांची कामना पूर्ण करणारा आहे, सर्वांच्या अधिकारांनी युक्त

आहे, अर्थात् 'महामंत्राच्या' संकीर्तनात सर्वांना अधिकार आहे; हा मंत्र, सर्वांचा मुख्य बांधव आहे, सर्वांना आकर्षण करण्याच्या शक्ति तेनयुक तआहे, दुष्टव्याधिंचा विनाशक आहे, दीक्षा विधि आदिची अपेक्षा रहित आहे, वेळेच्या प्रतिबंधरहित आहे, केवळ वाणीद्वारेच पूजित होण्या योग्य आहे, बाह्य पूजा विधिची अपेक्षा करत नाही, सर्वांना केवळ जीभेच्या स्पर्शमात्रानेच फलदायक आहे, देश काल इत्यादि नियमांच्या विमुक तआहे, अतः सर्ववादीजनांच्या द्वारे सुसम्मत आहे.॥१॥

आणि पहा, अथर्ववेदाच्या पिप्पलाद-शाखेत सांगितले आहे की-

**स्वनाम-मूलमंत्रेण सर्वं ह्लादयति विभुः स एव मूलमंत्रं जपति हरिरिति कृष्ण इति राम इति।**

सर्वावतारी प्रभु श्रीकृष्ण आपल्या नामरूप-मूलमंत्राच्या द्वारे सर्वांना आल्हादित करीत असतात, आणि तेच श्रीकृष्णचैतन्यमहाप्रभुंच्या रूपात 'हरे कृष्ण' इत्यादि स्वरुपाच्या मूळ महामंत्राचे स्पष्ट उच्चारण करत असतात. महामंत्रांच्या कीर्तनाचे फळ या प्रकारे आहे-

**मंत्रो गुह्यः परमो भक्ति तेद्यः नामान्यष्टावष्ट च शोभनानि।**
**तानि नित्यं ये जपन्ति धीरास्ते वै मायामतितरन्ति नान्ये॥**
**परमं मंत्रं परमरहस्यं नित्यमावर्तयति।**

' महामंत्र' परमगुह्य आहे आणि भक्ति तच्याद्वारेच जाणल्या जाऊ शकतो. त्यामध्ये 'हरे कृष्ण' इत्यादि आणि 'हरे राम' इत्यादि परम मनोहर आठ-आठ नाव आहेत, म्हणून जी बुध्दिमान व्यक्ति त या नावांचा नित्य जप करेत ती मायेतून अवश्यच विमुक तहोईल, दूसरे नाही. म्हणून बुध्दिमान पुरुष 'महामंत्राचे' कीर्तन, स्मरण आणि जप सदा-सर्वदा करतात.'

ब्रह्मांडपुराण उत्तरखंडात सहाव्या अध्यायात याचा उल्लेख केला गेला आहे की वृषभानुराजाने क्रतुमुनिपुढे प्रार्थना केली की हे भगवन्! जर माझ्या वर आपला अनुग्रह असेल, तर मला हरिनामाचे दान करावे. त्यावेळी महात्मा क्रतुमुनिने त्यांना 'हरे कृष्ण' इत्यादि सोळा नाम प्रदान केले. म्हणून बुध्दिमान व्यक्ति तला या'महामंत्राचे' संकीर्तन, सदा-सर्वदा करायला हवे - ' नामसंकीर्तनं तस्मात् सदा कार्यं विपश्चिता।'



# श्री चैतन्य महाप्रभु आणि महामंत्र

श्रीहरिनामसंकीर्तनाचे प्रवर्तक श्रीचैतन्यमहाप्रभुंनी पण भक तांना 'महामंत्राच्या' संकीर्तनाचा उपदेश दिला आहे. श्रीवासुदेवसार्वभौम भट्टाचार्य यांनी पण म्हटले आहे की -

**विषण्णचित्तान् कलिघोरभीतान्, संवीक्ष्य गौरो हरिनाममंत्रम्।**
**स्वयं ददौ भक तजनान्समादिशत्, संकीर्तयध्वं ननु नृत्यवाद्यैः॥**

श्री चैतन्य महाप्रभुंनी कलिकाळापासून विशेष भयभीत आणि दुःखी चित्त असलेल्या जीवांना पाहून, कृपापूर्वक स्वतः ' महामंत्र' चे दान केले आणि भक तजनांच्याप्रति आदेश दिला की, हे भक तलोक तुम्ही सर्व मिळून, नृत्य-वाद्य इत्यादि सहित, संकीर्तन करा.

श्रीवासुदेवसार्वभौम भट्टाचार्य यांनी पण सांगितले आहे की-

**"हरेर्नामप्रसादेन निस्तरेत् पातकी जनः।**
**उपदेष्टा स्वयं कृष्णचैतन्यो जगदीश्वरः॥**
**कृष्णचैतन्यदेवेन हरि-नाम-प्रकाशितम्।**
**येन केनापि तत्प्राप्तं धन्योऽसौ लोक-पावनः॥"**

श्रीहरिनामाच्या कृपेने, पापीजनांचा पण उध्दार होऊन जातो, कारण श्रीहरिनामाचे उपदेशक जगदीश्वर स्वयं श्रीकृष्णचैतन्यमहाप्रभु आहेत. म्हणून श्रीकृष्णचैतन्यदेवांद्वारे प्रकाशित हरिनाम ज्या कोणी व्यक्ति तला प्राप्त झाले ती व्यक्ति तधन्य आहे आणि आपल्या संगतीने इतर लोकांना पण पवित्र करणारी बनते.

श्रीचैतन्यचरितमहाकाव्य ११ सर्ग, ५४ श्लोकात महाकवि श्रीकर्णपूरांनी सांगितले आहे -

**"ततः श्रीगौराङ्गः समवददतीव प्रमुदितो**
**हरेकृष्णेत्युच्चैर्वद मुहुरिति श्रीमयतनुः।**
**ततोऽसौ तत् प्रोच्य प्रतिवलितरोमाञ्चललितो**
**रुदंस्तत्तत् कर्मारभत बहुदुःखैर्विदलितः॥"**

श्रीचैतन्यमहाप्रभुंच्या संन्यासग्रहणसमयी, न्हावी हातात वस्तरा घेऊन अत्यन्त दुःखाने रडत-रडत विव्हळ झाला आणि श्रीचैतन्यमहाप्रभुंच्या कुरळ्या

केसांचे मुण्डण करू नाही शकला, तेंव्हा श्रीराधाभाव-विभावित-विग्रहस्वरूप श्रीचैतन्यमहाप्रभु अत्यन्त प्रसन्न होऊन म्हणाले की हे नापित! तु उच्चस्वराने वारंवार 'हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥' या महामंत्राचे कीर्तन कर. श्रीमन्महाप्रभुचा निर्देश मिळाल्यावर तो न्हावी मंत्रमुग्ध होऊन महामंत्राचे कीर्तन करीत रोमांचित आणि पुलकित होऊन महान दु:खाने व्याकुळ असल्यावर सुद्धा रडत-रडत त्यांचे मुण्डण करणे आरंभ केले.

**"बाहु प्रसारिया प्रभु ब्राह्मणे तुलिला।**
**तार घरे भक्ति तभेरगान आरंभिला॥**
**ब्राह्मणेर घर येन हैल वृन्दावन।**
**हरिनाम शुनिबारे आइसे सर्वजन॥**
**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥'**

श्रीचैतन्यमंगल ग्रंथात पण पाहिले जाते की-

**''हरे कृष्ण' नाम प्रभु बोले निरन्तर'।**
**प्रसन्न श्रीमुखे हरे कृष्ण कृष्ण बलि।**
**विजय हैला गौरचन्द्र कुतूहली।**
**हरे कृष्ण हरे कृष्ण बलि' प्रेम-सुखे।**
**प्रत्यक्ष हैला आसि' अद्वैत-सम्मुखे॥'**

श्रीचैतन्यभागवतातही पाहिले जाते-

**'जय जय 'हरे कृष्ण'- मंत्रेर प्रकाश।**
**जय जय निजभक्ति तग्रहणविलास॥'**

मध्य ६.११७

**"प्रभु बले, - "कृष्णभक्ति तहउक सबार।**
**कृष्णनाम-गुण बइ ना बलिह आर॥**
**आपने सबारे प्रभु करे उपदेशे।**
**"कृष्णनाम महामंत्र शुनह हरिषे॥**
**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥**



**प्रभु बले, "कहिलाङ एइ महामंत्र।**
**इहा जप गिया सबे करिया निर्बंध॥**
**इहा हैते सर्वसिध्दि हैइबे सबार।**
**सर्वक्षण बल इथे विधि नाहि आर॥"**

मध्य २३/७४-७८

**"कि शयने कि भोजने किबा जागरणे।**
**अहर्निश चिन्त कृष्ण बलह वदने॥**

मध्य २८/२८

**"सर्वदा श्रीमुखे 'हरे कृष्ण हरे हरे।**
**बलिते आनंदधारा निरवधि झरे॥"**

अंत्य १/१९९

**कलियुगधर्म हय नामसंकीर्तन।**
**चारियुगे चारिधर्म जीवेर कारण॥**

आदि १४/१३७

**अतएव कलियुगे नामयज्ञ सार।**
**आर कौन धर्म कैले नाहि हय पार॥**
**रात्रिदिन नाम लय खाइते शुइते।**
**ताँहार महिमा वेदे नाहि पारे दिते॥**
**शुन मिश्र, कलियुगे नाहि तप यज्ञ।**
**येइ जन भजे कृष्ण, ताँर महाभाग्य॥**
**अतएव गृहे तुमि कृष्ण भज गिया।**
**कुटिनाटि परिहरि एकान्त हइया॥**
**साध्य-साधनतत्त्व ये किछु सकल।**
**हरिनामसंकीर्तने मिलिबे सकल॥**

आदि १४/१३९-१४३

**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥**
**एइ श्लोक नाम बलि लय महामंत्र।**
**षोल-नाम बत्तिश अक्षर एइ तंत्र॥**
**साधिते साधिते यबे प्रेमांकुर हबे।**

**साध्य-साधनतत्त्व जानिबा से तबे॥**

आदि १४/१४५-१४७

श्रीचैतन्यचरितामृतमध्ये पण पहा-

**"कृष्ण नाम महा-मंत्रेर एइ त' स्वभाव।**
**ये जपे, तार कृष्णे उपजये भाव॥**
**कृष्णविषयक प्रेमा-परम पुरुषार्थ।**
**यार आगे तृणतुल्य चारि पुरुषार्थ॥**
**पञ्चम पुरुषार्थ-प्रेमानन्दामृत-सिन्धु।**
**ब्रह्मादि-आनन्द यार नहे एक बिन्दु॥**
**कृष्ण-नामेर फलऽ 'प्रेमा' सर्व शास्त्रे कय"।**

आ ७/८३.८६

**"कलिकाले नामरूपे कृष्ण-अवतार।**
**नाम हैते हय सर्व-जगत्-निस्तार॥"**

आदि १७।२२

**"कलिकाले धर्म-कृष्णनामसंकीर्तन॥**
**सङ्कीर्तन-यज्ञे ताँरे करे आराधन।**
**से त' सुमेधा आर-कलिहतजन॥"**

मध्य ११/९८-९९

**"निरन्तर कर कृष्णनामस्संकीर्तन।**
**हेलाय 'मुक्ति तं पाबे, पाबे प्रेम-धन॥"**

मध्य २५/१४७

**"एक 'नामाभासे' तोमार पाप-दोष याबे।**
**आर 'नाम' लइते कृष्णचरण पाबे॥"**

मध्य २५/१९२

**"नामेर फले कृष्ण-पदे प्रेम उपजय॥"**

अंत्य ३/१७७
अंत्य ७/१०४

**"कलिकालेर धर्मकृष्ण-नाम-संकीर्तन"**

अंत्य ७/११



**"हर्षे प्रभु कहेन शुन स्वरूप-राम-राय।**
**नामस्संकीर्तन कलौ परम उपाय॥**
**सङ्कीर्तनयज्ञे कलौ कृष्ण-आराधन।**
**से त' सुमेधा पाय कृष्णेर चरण॥"**

अंत्य २०/८-९

**"नाम-संकीर्तन हैते सर्वानर्थ-नाश।**
**सर्व-शुभोदय कृष्णे प्रेमेर उल्लास॥"**

अंत्य २०/११

**"खाइते शुते यथा तथा नाम लय।**
**काल, देश, नियम नाहि सर्व सिद्धि हय॥"**

अंत्य २०/१८

**"एइमत हत्रा येइ कृष्णनाम लय।**
**श्रीकृष्णचरणे ताँर प्रेम उपजय॥"**

अंत्य २०/२६

**"एकदा कृष्णविरहाद् ध्यायन्ती प्रियसङ्गमम्।**
**मनोबाष्पनिरासार्थं जल्पतीदं मुहुर्मुहुः॥**
**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥**
**यानि नामानि विरहे जजाप वार्षभानवी।**
**तान्येव तद्भावयुक् तोगौरचन्द्रो जजाप ह॥**
**श्रीचैतन्यमुखोद्गीर्णा हरे कृष्णेति वर्णकाः।**
**मज्जयन्तो जगत् प्रेम्णि विजयन्तां तदाह्वयाः॥"**

एकदा, श्रीकृष्णाच्या विरहात व्याकुळ झालेली श्री राधिका, आपल्या प्रियतम श्यामसुंदराच्या मिलनावर ध्यान करत, आपला विरहाग्नि दूर करण्यासाठी "हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥" हा 'महामंत्र' जप करू लागली. श्रीकृष्णाच्या विरहात श्रीमती राधिकेने, श्रीकृष्णांच्या ज्या नावांचा जप केला, श्रीराधाभावभावित श्री चैतन्य महाप्रभुंनी पण त्याच नावांचा जप केला. म्हणून श्रीचैतन्य महाप्रभुंच्या श्रीमुखातून निघालेले

श्रीकृष्णाचे सोळा नामात्मक आणि बत्तीस अक्षरात्मक श्रीहरिनाम महामंत्र, विश्वाला कृष्णप्रेमात निमग्न करून सर्वोपरि विराजमान राहो; त्याचा जय हो, जय हो.'

ब्रम्हांडपुराण उत्तरखण्ड ६/५५ त पण महामंत्राचा उल्लेख आहे-

**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥**

**'हरिः' 'कृष्णः' 'राम' इति नामत्रयात्मको 'महामंत्रः'।**
**तस्मिन संबोधनात्मकानि त्रीणि नामानि सन्ति। तत्र त्रयाणाम**

# महामंत्राच्या व्याख्या

## माधुर्यमयी व्याख्या-

**विज्ञाप्य भगवत्तत्त्वं चिद् घनानन्दविग्रहम्**
**हरत्यविद्यां तत्कार्यमतो हरिरिति स्मृतः॥**
**आनन्दैकसुखः श्रीमान् श्यामः कमल-लोचनः।**
**गोकुलानन्दो नन्दनन्दनः कृष्ण ईर्यते॥**
**वैदग्धीसारसर्वस्वं मूर्तिलीलाधिदैवतम्।**
**श्रीराधां रमय नित्यं राम इत्यभिधीयते॥**

(ब्रह्माण्ड पुराण)

हरि, कृष्ण, राम - या तीन नावांनी युक्त 'महामंत्र' आहे. त्यात संबोधनात्मक तीन नाम आहेत. या तीन नावांची माधुर्यमयी व्याख्या या प्रकारे आहे-

सच्चिदानन्द-विग्रह असणारे भगवान आपल्या तत्त्वाला ठीक समजून, जीवाची अविद्या आणि त्याचे कार्य अज्ञानाला हरण करत असतात, म्हणून ते 'हरि' या नामाने स्मरण केले जात. एकमात्र आनंदरसविग्रह, गोकुळाचे आनंदप्रद कमललोचन, नंदनंदन श्रीश्यामसुंदरच 'कृष्ण' -नावाने ओळखले जातात.



लीलेचे मूर्तिमानविग्रह अथवा अधिष्ठातृदेव रसिकचूडामणि विदग्धशिरोमणि श्रीकृष्ण श्रीमती राधिकेला निरंतर रमण करवतात अर्थात आनंदित करतात, म्हणून ते 'राम' या नावाने ओळखले जातात.

## ऐश्वर्यमयी व्याख्या-

**हरति त्रिविधं तापं जन्मकोटिशतोद्भवम्।**
**पापं च स्मरतां यस्मात्तस्माध्दरिरिति स्मृतः॥**
**कृषिर्भूवाचकः शब्दो णश्च निर्वृतिर्वाचकः।**
**तयोरैक्यं परं ब्रह्म कृष्ण इत्यभिधीयते॥**
**रमन्ते योगिनोऽनन्ते सत्यानन्दे चिदात्मनि।**
**इति रामपदेनासौ परंब्रह्माऽभिधीयते॥**

भगवान श्रीकृष्ण आपल्या स्मरण करणाऱ्या भक्तांच्या कोटी जन्मांचे त्रिविध-ताप आणि कायिक-वाचिक-मानसिक तीन तापांना हरण करतात, म्हणून ते 'हरि'-नावाने ओळखले जातात. ' कृष'- धातु आकर्षक सत्तावाचक आहे आणि 'ण'-शब्द निर्वृति अर्थात आनन्दवाचक आहे. या दोघांचे एकतामय आनंद-स्वरूप आकर्षक परब्रह्मच 'कृष्ण' या नावाने ओळखल्या जाते. नित्य आनंद-स्वरूप आणि चिन्मय स्वरूपाच्या ज्या श्रीकृष्णात योगीलोग रमण करतात अर्थात क्रीडा करतात, तात्पर्य-त्यांच्या ध्यानाने आनन्द प्राप्त करतात , म्हणून परब्रह्मस्वरूप ते श्रीकृष्णच 'राम'-नावाने ओळखले जातात.

## युगलस्मरणमयी व्याख्या-

**मनो हरति कृष्णस्य कृष्णाह्लाद-स्वरूपिणी।**
**ततो हरा श्रीराधैव तस्याः संबोधनं हरे॥**
**अपगृह्य त्रपां धर्मं धैर्यं मानं व्रजस्त्रियः।**
**वेणुना कर्षति गृहात् तेन कृष्णोऽभिधीयते॥**
**रमयत्यनिशं रूप-लावण्यैर्व्रजयोषिताम्।**
**मनः पंचेन्द्रियाणीह रामस्तस्मात् प्रकीर्तितः॥**

श्रीकृष्णाची आल्हादस्वरूपिणि (ह्लादिनीशक्ति) श्रीराधा श्रीकृष्णाच्या चित्ताचे हरण करते, म्हणून श्रीराधाच 'हरा'-नावाने ओळखल्या जाते. ' हरा'-

शब्दाचे संबोधनात 'हरे' रूप बनते. व्रजराजकुमार व्रजांगनांच्या लज्जा -धर्म-धैर्य आणि मानाचे हरण करून, आपल्या वंशीद्वारे, त्यांना आपापल्या घरातून आपल्याकडे आकर्षित करतात; म्हणून ते 'कृष्ण' या नावाने ओळखले जातात. तेच श्रीकृष्ण आपल्या रूप-लावण्य इत्यादि द्वारे व्रजांगनांचे मन आणि इंद्रियांना निरंतर आनन्दित करतात, याच कारणास्तव ते 'राम' या नावाने ओळखले जातात.

## श्रीजीवगोस्वामिकृता 'महामंत्र'-व्याख्या-

**सर्वचेतोहरः कृष्णस्तस्य चित्तं हरत्यसौ।**
**वैदग्धीसारविस्तारैरतो राधा हरा मता ॥१॥**
**कर्षति स्वीयलावण्यमुरलीकलनिःस्वनैः।**
**श्रीराधां मोहनगुणाऽलंकृतः कृष्ण ईर्यते ॥२॥**
**श्रूयते नीयते रासे हरिणा हरिणेक्षणा**
**एकाकिनी रहःकुंजे हरेयं तेन कथ्यते ॥३॥**
**अङ्गश्यामलिमस्तोमैः श्यामलीकतकाञ्चनः।**
**रमते राधया सार्धमतः कृष्णो निगद्यते ॥४॥**
**कृत्वारण्ये सरः श्रेष्ठं कान्तयानुमतस्तया।**
**आकृष्य सर्वतीर्थानि तज्ज्ञानात् कृष्ण ईर्यते ॥५॥**
**कृष्यते राधया प्रेम्णा यमुनातटकाननम्।**
**लीलया ललितश्चापि धीरैः कृष्ण उदाहृतः॥६॥**
**हृतवान गोकुले तिष्ठन्नरिष्टं पुष्टपुङ्गवम्।**
**श्रीहरिस्तं रसादुच्चै रायतीति हरा मता॥७॥**
**ह्यस्फुटं रायति प्रीतिभरेण हरिचेष्टितम्।**
**गायतीति मता धीरैर्हरा रसविचक्षणैः॥८॥**
**रसावेशपरिस्रस्तां जहार मुरलीं हरेः।**
**हरेति कीर्तिता देवी विपिने केलिलंपटा॥९॥**
**गोवर्धनदरीकुंजे परिरंभविचक्षणः।**
**श्रीराधां रमयामास रामस्तेन मतो हरिः॥१०॥**
**हन्ति दुःखानि भक्तानाराति सौख्यानि चान्वहम्।**



**हरा देवी निगदिता महाकारुण्यशालिनी॥११॥**
**रमते भजते चेतः परमानन्दवारिधौ।**
**अत्रेति कथितो रामः श्यामसुन्दरविग्रहः॥१२॥**
**रमयत्यच्युतं प्रेम्णा निकुञ्जवनमन्दिरे।**
**रामा निगदिता राधा रामो युतस्तया पुनः॥१३॥**
**रोदनैर्गोकुले दावानलमाशयति ह्यसौ।**
**विशोषयति तेनोक्तोरामो भक्तसुखावहः॥१४॥**
**निहन्तुमसुरान् यातो मथुरापुरमित्यसौ।**
**तदागमद्रहःकामो यस्याः सासौ हरेति च॥१५॥**
**आगत्य दुःखहर्ता यो सर्वेषां व्रजवासिनाम्।**
**श्रीराधाहारिचरितो हरिः श्रीनन्दनन्दनः॥१६॥**

श्रीकृष्णचंद्र आपल्या लोकोत्तर सौंदर्याद्वारे, सर्वांच्या चित्ताचे हरण करतात; परन्तु श्रीमती राधिका आपल्या श्रेष्ठ चातुर्याचा विस्तार करून श्रीकृष्णाच्या चित्ताचे पण हरण करते, अतः श्रीराधिका 'हरा' मानली जाते. ' हरा'- शब्दाचे संबोधन एकवचनात 'हरे'-रूप बनते॥१॥

भुवनमोहनगुणांद्वारे अलंकृत श्रीहरि आपल्या लावण्य (सौंदर्य) आणि मुरलीच्या मधुरध्वनिंद्वारे श्रीराधिकेला आपल्या कडे आकर्षित करतात, म्हणून 'कृष्ण' नावाने ओळखले जातात. ॥२॥

महापुरुषांच्या मुखातून ऐकण्यात येते की, मृगलोचना श्रीमती राधिका श्रीकृष्णाच्याद्वारे रासमंडलात विद्यमान एकांत निकुंजातून एकटीच अपहरण केली जाते, म्हणून राधिकाच 'हरा' नावाने ओळखली जाते, त्याचे संबोधनात 'हरे'-रूप बनते.॥३॥

आपल्या श्रीअंगाच्या श्यामकांतिच्या समुदायाद्वारे, जे सुवर्णाला पण श्यामवर्णाचे बनवून टाकतात , म्हणून तेच श्रीराधारमण श्यामसुंदर 'कृष्ण'-नावाने ओळखले जातात.॥४॥

आपली कांता श्रीराधिकेच्या इच्छेनूसार श्रीहरिंनी, गोवर्धनाच्या निकट व्रजाच्या वनात श्यामकुण्ड-नामक श्रेष्ठ सरोवर प्रकट करून त्यामध्ये सर्व तीर्थांना आकर्षित केले, या गूढ रहस्याला जाणूनच , विज्ञजन त्यांना 'कृष्ण' नावाने ओळखतात.॥५॥

आपल्या भुवनमोहिनीलीलेद्वारे धीरललित नायक, सर्वमोहन श्रीहरिपण

श्रीराधिकेच्या महाभावरूपी लोकोत्तर प्रेमाद्वारे, यमुनातटवर्ती श्रीवृन्दावनात आकर्षित केले जातात, म्हणून बुध्दिमान लोक त्यांना कृष्ण नावाने संबोधन करतात.॥६॥

व्रजात निवास करत्यावेळी श्रीकृष्णाने, वृषरूपधारी बलिष्ठ अरिष्टासुराचे प्राणसुध्दा अपहरण केले होते. त्यावेळी श्रीराधिकेने त्यांना आनंदोल्लासपूर्वक उच्च स्वरात 'हरि-हरि' म्हणून संबोधन केले होते, म्हणून राधा 'हरा'-नावाने ओळखली जाते. ' हरा'- शब्दाचे संबोधनात 'हरे'-रूप बनते.॥७॥

श्रीराधिका, श्रीकृष्णाच्या लीलांचे कधी अस्पष्ट स्वरांत गान करते, तर कधी प्रीतिच्या अधिकतेमूळे उच्च स्वरात गाते, म्हणून रसविवेचनात अभिज्ञपंडितांद्वारे, ती 'हरा' नावाने ओळखली जाते, त्याचे संबोधनात 'हरे'-रूप बनते॥८॥

वृंदावनात क्रीडापरायणा श्रीमती राधिका, रसाच्या आवेशात श्रीकृष्णाच्या हातातून पडलेल्या मुरलीचे अपहरण करते, म्हणून राधिकादेवी हरा- नावाने ओळखल्या जाते, त्याचे संबोधनात 'हरे'-रूप बनते॥९॥

आलिंगन करण्यात चतुरशिरोमणि श्रीकृष्णाने , गोवर्धनाच्या गुह्वारूपी -निकुञ्जात श्रीराधिकेच्यासोबत रमण अर्थात क्रीडा केली, म्हणून ते 'राम' नावाने ओळखले जातात.॥१०॥

महाकारुण्यशालिनी देवी राधिका भक तांच्यासमस्त दुःखाना हरण करते, आणि प्रतिदिन सुखांना प्रदान करते, म्हणून ती 'हरा'-नावाने ओळखली जाते, ज्याचे संबोधन 'हरे'-रूप बनते.॥११॥

भजन करणाऱ या भक्तांचे तांचे मन परमानंदसिंधु-श्रीकृष्णात रमण करते, या कारणास्तव श्यामसुंदर विग्रह असणारे श्रीकृष्णच येथे 'राम' नावाने ओळखले जातात. ॥१२॥

श्रीमती राधिका निकुञ्जात श्रीहरिला प्रेमपूर्वक आनंद प्रदान करते, म्हणून "रमयति-आनंदयति" या व्युत्पत्तिच्या अनुसार त्यांचेच नाम 'रामा' आहे. रामा अर्थात श्रीराधाच्यासोबत सम्मिलित झाल्यामूळे, श्रीकृष्णच 'राम'-नावाने ओळखले जातात.॥१३॥

व्रजवासिंच्या रोदनाने परिपूर्ण व्रजात भक तजनसुखदायी श्रीकृष्णाने, दावानल पान करून, त्याला सुकवून टाकले होते, म्हणून भक तांनारमण करवणारे ते श्रीकृष्णच, ' राम'-नामाने संबोधित होतात॥१४॥



श्रीकृष्ण कंस इत्यादि असुरांना मारण्यासाठी मथुरापुरीत निघून गेले होते, नंतर श्रीराधिकेला एकान्तात भेटण्यासाठी पुनः व्रजात आले होते; म्हणून मथुरा इत्यादि धामातून व्रजाकडे श्रीकृष्णाला अपकरण केल्यामूळे श्रीराधिकाच 'हरा'-नामाने ओळखली जाते, त्याचेच संबोधनात 'हरे'-रूप बनते.॥१५॥

ज्यांनी मथुरा आणि द्वारकेतून येऊन, समस्त व्रजवासिंचे दुःख हरण केले होते; म्हणून श्रीमती राधिकेच्या मनाला हरण करणाऱ यालीलेद्वारे युक त श्रीनंदनंदनच हरि नावाने ओळखले जातात. ' हरि'- शब्दाचे संबोधनात 'हरे' असे रूप बनते॥१६॥

इति श्रीजीवगोस्वामिविरचिता 'महामंत्र'-व्याख्या समाप्ता।

## श्रीगोपालगुरुगोस्वामिकृता 'महामंत्र'-व्याख्या-

**अज्ञानतत्कार्यविनाशहेतोः सुखात्मनः श्यामकिशोरमूर्तेः।**
**श्रीराधिकाया रमणस्य पुंसः स्मरन्ति नित्यं महतां महान्तः॥१॥**
**विलोक्य तस्मिन् ससिकं कृतज्ञं जितेंद्रियं शान्तमनन्यचित्तम्।**
**कृतार्थयन्ते कृपया सुशिष्यं प्रदाय नामत्रययुक तपद्यम्॥२॥**
**हरिर्हरति पापानि दुष्टचित्तैरपि स्मृत :।**
**अनिच्छयापि संस्पृष्टो दहत्येव हि पावकः॥३॥**
**विज्ञाप्य भगवत्तत्वं चिद् घ्न घनानन्दविग्रहम्**
**हरत्यविद्यां तत्कार्यमतो हरिरिति स्मृतः॥४॥**

**अथवा सर्वेषां स्थावरजङ्गमादीनां तापत्रयं हरतीति हरिः। यद्वा दिव्यसद्गुणश्रवणकथनद्वारा सर्वेषां विश्वादीनां मनो हरतीति। यद्वा स्वमाधुर्येण कोटिकन्दर्पलावण्येन सर्वेषामवतारादीनां हरतीति हरिः। हरिशब्दस्य संबोधने "हे हरे"॥५॥**

**रासादिप्रेमसौख्यार्थे हरेर्हरति या मनः।**
**हरा सा गीयते सद्भिर्वृषभानुसुता परा॥६॥**
**स्वरूपप्रेमवात्सल्यैर्हरति या मनः।**
**हरा सा कथ्यते सद्भिः श्रीराधा वृषभानुजा॥७॥**
**हरति श्रीकृष्णमनः कृष्णाल्हादस्वरूपिणी।**
**अतो हरेत्यनेनैव श्रीराधा परिगीयते।**

**इत्यादिना श्रीराधावाचक-हरा-शब्दस्य संबोधने हरे॥८॥**

**कृषिर्भूवाचकः शब्दो णश्च निर्वृत्तिवाचकः।**

**तयोरैक्यं परं ब्रह्म कृष्ण इत्यभिधीयते॥९॥**

**ईश्वरः परमः कृष्णः सच्चिदानन्दविग्रहः।**

**अनादिरादिर्गोविन्दः सर्वकारणकारणम्॥१०॥**

**आनन्दैकसुखः श्रीमान् श्यामः कमललोचनः।**

**गोकुलोनन्दनो नन्दनन्दनः कृष्ण ईर्यते।**

**कृष्णशब्दस्य संबोधने कृष्ण॥११॥**

**राशब्दोच्चारणाद्देवि ! बहिर्निर्यान्ति पातकाः।**

**पुनः प्रवेशकाले तु मकारश्च कपाटवत्॥१२॥**

**रमन्ते योगिनोऽनन्ते सत्यानन्दे चिदात्मनि।**

**इति रामपदेनादः परंब्रह्माऽभिधीयते॥१३॥**

**वैदग्धीसारसर्व्वस्वं मूर्त्तलीलाधिदैवतम्।**

**श्रीराधां रमयन् नित्यं राम इत्यभिधीयते॥१४॥**

**श्रीराधायाश्चित्तमाकृष्य रमते क्रीडतीति रामः।**

**रामशब्दस्य संबोधने राम॥**

**तथा हि क्रमदीपिकायां चन्द्रं प्रति श्रीकृष्णः-**

**मम नामशतेनैव राधानाम सदुत्तमम्।**

**यः स्मरेत्तु सदा राधां न जाने तस्य किं फलम्॥१५॥**

अज्ञान आणि त्याच्या द्वारे उत्पन्न संसाररूप-व्याधिला विनष्ट करणाऱ्या आनंदस्वरूप, श्यामकिशोरमूर्ति, श्रीराधारमणाला महाभागवतगण नित्य स्मरण करतात॥१॥

तेच महाभागवतगण आपल्या योग्य-शिष्यांना, त्याच श्रीराधारमणाचे अनुरागी रसिक पाहून आणि त्या शिष्याला कृतज्ञ, जितेन्द्रिय, शान्त आणि अनन्यचित्त असलेला समजून, कृपा करून 'हरे कृष्ण' इत्यादि तीन नामांनी युक्त तपद, अर्थात् महामंत्र देऊन कृतार्थ करतात ॥२॥

बिना इच्छेचा स्पर्श झालेला अग्निपण ज्या प्रकारे जाळूनच टाकतो, त्याचप्रमाणे दुष्टचित्ताच्या मनुष्याद्वारे कशाही प्रकारे स्मरण केल्यामुळे प्रभु त्यांच्या समस्त पापांना हरण करतात, म्हणून त्यांचे नाव 'हरि' आहे. ॥३॥ अथवा सच्चिदानन्दविग्रह-स्वरूप भगवान् आपल्या नावाचे कीर्तन-स्मरण



करणाऱ्या याच्या हृदयात तत्त्वाची स्फूर्ति करवून अविद्या आणि तिचे कार्य-अज्ञानाचे हरण करतात, म्हणून तेच प्रभु 'हरि'-नावाने स्मरण केले जातात॥४॥

अथवा स्थावर-जंगम इत्यादि सर्व प्राण्यांच्या तीन प्रकारच्या तापांना हरण करतात, याच कारणास्तव ते 'हरि' म्हणून ओळखले जातात, अथवा आपल्या सद्गुणांच्या श्रवण-कीर्तनाच्या द्वारे सर्व संसारी प्राण्यांचे मन हरण करतात; म्हणून त्यांचे नाव 'हरि' आहे, अथवा कोटी कामदेवांपेक्षा पण अधिक आपल्या स्वाभाविक सौंदर्य माधुर्याच्या द्वारे सर्व अवतारांच्या मनांचे हरण करतात; म्हणून ते व्रजराजकुमार श्रीकृष्णच 'हरि' नावाने ओळखले जातात. ' हरि' शब्दाच्या संबोधनात 'हरे'-रूप बनते.॥५॥

अथवा रास आदि प्रेममय सुखाला संपादन करण्यासाठी आपल्या स्वरूप-गुण-प्रेम-वात्सल्य इत्यादि द्वारे श्रीकृष्णाच्या मनाचे पण हरण करते, म्हणून श्रीकृष्णाची ह्लादिनीशक्ति तवृषभानुनंदिनी श्री राधाच सज्जनांच्या द्वारे 'हरा'-नावाने संबोधली जाते, आणि गायली जाते. अशा प्रकारे राधा-वाचक 'हरा'- शब्दाचे संबोधन 'हरे'-रूप बनते.॥६-८॥

' कृष'-धातु आकर्षक, सत्तावाचक, आणि 'ण'-शब्द निर्वृत्ति अर्थात आनंदवाचक आहे. या दोघांचे एकतामय आनंदस्वरूप सर्वाकर्षक परब्रह्मच 'कृष्ण'-नावाने ओळखल्या जाते॥९॥

स्वयं अनादि व सर्वांचे आदि आणि सर्व कारणांचे कारण, सच्चिदानंद-विग्रहाचे परमेश्वर गोविंदच 'कृष्ण'-नावाने ओळखल्या जातात॥१०॥

एकमात्र आनंदरसविग्रह आणि गोकुळाला आनंद देणारे, कमललोचन, नंदनंदन श्रीमान् श्यामसुंदर च 'कृष्ण' नावाने ओळखले जातात. ' कृष्ण'-शब्दाच्या संबोधनात 'कृष्ण' असे रूप बनते॥११॥

शंकरजी पार्वतीला म्हणाले की हे देवि! ' राम' शब्दाचे पहिले अक्षर 'रा'-शब्दाच्या उच्चारणाने समस्त पाप शरीराच्या बाहेर निघतात, पुन्हा प्रवेश करण्याच्यावेळी तो 'म'-कार मुखावरती खिडकीप्रमाणे बंद होतो, म्हणून पाप पुनः प्रवेश करू शकत नाहीत.॥१२॥

योगीजन चिन्मय, अनंत, सत्य आणि आनंदस्वरूप ज्या परतत्त्वात रमण करतात, ते परतत्व परं ब्रह्मच 'राम'-नावाने ओळखले जाते॥१३॥

रसमयी लीलेचे मूर्तिमान अधिष्ठातृदेव चतुरशिरोमणि रसिकशेखर श्रीकृष्ण श्रीमती राधिकेला नित्य रमण करवतात, म्हणून तेच 'राम'-नावाने ओळखले जातात॥१४॥

अथवा श्रीराधिकेच्या चित्ताला आपल्याकडे आकर्षित करून तिच्या सोबत रमण करतात, अर्थात क्रीडा करतात, म्हणून ते श्रीकृष्णच 'राम' नावाने ओळखले जातात. ' राम'- शब्दाच्या संबोधनात 'राम' असे रूप बनते. पहा, ' क्रमदीपिकेत' चंद्राच्या प्रति श्रीकृष्णाने म्हटले आहे की माझ्या शेकडो नावांपेक्षा 'राधा'-नाम श्रेष्ठ आहे. यो व्यक्ति त्र सदा सर्वदा श्रीराधेचे स्मरण-कीर्तन करतो, त्याला कोणते फळ मिळते, हे मीपण जाणत नाही॥१५॥

**हरे- कृष्णस्य मनो हरतीति हरा राधा, तस्याः संबोधने हे हरे।**राधिका श्रीकृष्णाचे मन हरण करते, म्हणून तीच 'हरा' नावाने ओळखली जाते. तिच्या संबोधनाने 'हे हरे' असे रूप बनते.

**कृष्ण- राधाया मनः कर्षतीति कृष्णः, तस्य संबोधने हे कृष्ण।**जे श्रीराधेच्या मनाला आकर्षित करतात, ते आहे श्रीकृष्ण. ' कृष्ण'- शब्दाच्या संबोधनात 'हे कृष्ण' असे रूप बनते.

**हरे- कृष्णस्य लोकलज्जाधैर्यादि सर्वं हरतीति हरा राधा, तस्याः संबोधने हे हरे।**श्रीराधिका, श्रीकृष्णाची लोकलज्जा-धैर्य इत्यदि सर्वाचे हरण करते. या प्रकारे तिला हरा म्हटले जाते. ' हरा'- शब्दाचे संबोधन 'हे हरे' असे रूप बनते.

**कृष्ण- राधाया लोकलज्जाधैर्यादि सर्वं कर्षतीति कृष्णः, तस्य संबोधने हे कृष्ण।** श्रीकृष्ण, राधिकेच्या लोकलज्जा-धैर्य इत्यादि सर्वांचे आकर्षण करतात. याचमूळे ते 'कृष्ण' म्हणून ओळखले जातात. ' कृष्ण' शब्दाच्या संबोधनात 'हे कृष्ण' असे रूप बनते.

**कृष्ण- यत्र यत्र राधा तिष्ठति गच्छति वा तत्र तत्र सा पश्यति कृष्णो मां स्पृशति, बलात कञ्चुकादिकं सर्वं हरतीति कृष्णः, तस्य संबोधने हे कृष्ण।**श्रीराधिका जेथे जेथे आहे किंवा जाते, ती तेथे तेथे पहाते की श्रीकृष्ण माझा स्पर्श करत आहेत आणि बलपूर्वक माझी कंचुकी इत्यादि सर्वांना आकर्षण करतो आहे. त्यामूळे ते 'कृष्ण' म्हणून ओळखले जातात. ' कृष्ण'- शब्दाचे संबोधनात 'हे कृष्ण' असे रूप बनते.

**कृष्ण- पुनर्हर्षतां गमयति वनं कर्षतीति कृष्णः, तस्य संबोधने हे कृष्ण।**ते श्रीराधाला हर्षित करतात आणि वंशी वाजवून वृदांवनाकडे आकर्षित



करतात. म्हणून 'कृष्ण' या नावाने ओळखले जातात. ' कृष्ण' शब्दाच्या संबोधनात 'हे कृष्ण' असे रूप बनते.

**हरे- यत्र कृष्णो गच्छति तिष्ठति वा तत्र तत्र पश्यति राधा ममाग्रे पार्श्वे सर्वत्र तिष्ठति विहरति इति हरा राधा, तस्याः संबोधने हे हरे।**श्रीकृष्ण ज्या स्थानी जातात किंवा बसतात, ते त्या त्या स्थानावर पाहतात कि, श्रीराधा माझ्या मागे-पुढे माझ्या आजु-बाजुला विराजमान (उपस्थित) आहे- सगळीकडे विहार करत आहे. म्हणून ती 'हरा' म्हणून ओळखली जाते. ' हरा'- शब्दाच्या संबोधनात 'हे हरे' असे रूप बनते.

**हरे-पुनस्तं कृष्णं हरति स्वस्थानमभिसारयतीति हरा राधा, तस्याः संबोधने हे हरे।**तीच पुन्हा श्रीकृष्णाचे हरण होते, अर्थात् आपल्या सकेंत-स्थानाकडे श्रीकृष्णाला अभिसार करवते; म्हणून श्रीराधाच 'हरा' नावाने ओळखली जाते. तिचे संबोधन 'हे हरे' असे रूप बनते.

**हरे- कृष्णं वनं हरति वनमागयतीति हरा राधा, तस्याः संबोधने हे हरे।** श्रीकृष्णाला वनाकडे हरण करते, अर्थात वृंदावनाकडे हरण करते; म्हणून श्रीराधाच 'हरा ' म्हणून ओळखली जाते. ज्याचे संबोधनात 'हे हरे' असे रूप बनते.

**राम- रमयति तां निरीक्षणादिनेति रामः, तस्यः संबोधने हे राम।**श्रीकृष्ण आपल्या हास-परिहास, दर्शन इत्यादिद्वारा श्रीराधिकेला रमण करवतात, अर्थात् आनन्दित करतात, म्हणून त्यांचेच नाव 'राम' आहे. ज्याचे संबोधनात 'हे राम' असे रूप बनते.

**हरे- तात्कालिक धैर्यावलंबनादिकं कृष्णस्य हरतीति हरा राधा, तस्याः संबोधने हे हरे।**श्रीकृष्णाचे तात्कालिक धैर्य-अवलंबन इत्यदिचे हरण करते, म्हणून श्रीराधाच 'हरा' आहे. ज्याचे संबोधनात 'हे हरे' असे रूप बनते.

**राम- चुम्बन-स्तनाकर्षणालिंगनादिभिः रमते इति रामः, तस्य संबोधने हे राम।**श्रीकृष्ण चुंबन, स्तन-आकर्षण, आणि आलिंगन इत्यादि द्वारा श्रीराधिकेच्यासोबत रमण अर्थात् क्रीडा करतात; म्हणून ते पण 'राम' नामाने ओळखले जातात. ज्याचे संबोधनात 'हे राम' असे रूप बनते.

**राम- पुनस्तां पुरुषोचितां कृत्वा रमयतीतिः रामः, तस्य संबोधने हे राम।** श्रीकृष्ण राधिकेला पुरुषाकार बनवून तिच्या सोबत पुन्हा रमण करतात, म्हणून ते 'राम' नावाने ओळखले जातात. ज्याचे संबोधनात 'हे राम' असे रूप बनते.

**राम- पुनस्तत्र रमते इति रामः, तस्य संबोधने हे राम।**तेथे पुनः-पुनः त्याचप्रकारे रमण करतात, त्याच कारणास्तव ते 'राम' नामाने ओळखले जातात. ज्याचे संबोधनात 'हे राम' असे रूप बनते.

**हरे- पुनः रासान्ते कृष्णस्य मनो हृत्वा गच्छतीति हरा राधा, तस्याः संबोधने हे हरे।** रासलीलेच्या शेवटी, पुनः श्रीकृष्णाचे मन हरण करून निघून जाते, म्हणून राधाच 'हरा'-नावाने ओळखली जाते. ज्याचे संबोधनात 'हे हरे' असे रूप बनते.

**हरे- राधाया मनो हृत्वा गच्छतीति हरिः कृष्णः, तस्य संबोधने हे हरे।**श्रीकृष्णपण रासलीलेच्या शेवटी, राधिकेचे मन हरण करून निघून जातात, म्हणून तेच 'हरि' म्हणून ओळखले जातात. त्याचे संबोधनात 'हे हरे' असे रूप बनते.

इति श्रीगोपालगुरुगोस्वामिविरचिता 'महामंत्र'-व्याख्या समाप्ता।

## श्रीरघुनाथदासगोस्वामिकृता 'महामंत्र'-व्याख्या-

**एकदा कृष्णविरहाद् ध्यायन्ती प्रियसङ्गमम्।**
**मनोबाष्पनिरासार्थं जल्पतीदं मुहुर्मुहुः॥**
**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।**
**हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥**

**हे हरे - स्वनामश्रवणमात्रेण स्वमाधुर्येण च मच्चेतो हरसि।**

तत्र हेतुः **हे कृष्ण इति। कृष् शब्दस्य सर्वार्थः णश्च आनन्द-स्वरूप इति स्वार्थे णः। सच्चिदानन्दस्वरूपक इति स्वीयेन सार्वदिकपरमानन्देन सर्वाधिकपरमानन्देन वा प्रलोभ्य इति भावः।**

ततश्च **हे हरे - वंशीवादने मम धैर्यलज्जागुरुभयादिकम् अपि हरसि।**

ततश्च **हे कृष्ण - स्वाङ्गसौरभेण मां स्वगृहेभ्यो वृन्दावनं प्रत्याकर्षसि।**

ततश्च **हे कृष्ण - वनं प्रविष्टाया मे कञ्चुकीं सहसैवागत्य कर्षसि।**

ततश्च **हे कृष्ण - स्वाङ्गलावण्येन सर्वाधिकानन्देन च मां प्रलोभ्य मत् कुचौ कर्षसि (नखैराकर्षसि)।**

ततश्च **हे हरे - स्वबाहुनिबध्दां मां पुष्पशय्यां प्रति हरसि।**

ततश्च **हे हरे - तत्र निवेशिताया मे अन्तरीयमपि बलाध्दरसि।**

**हे हरे - अन्तरीयवसनहरणमिषेणात्मविरहपीडां सर्वमेव हरसि।**



ततश्च **हे राम - स्वच्छन्दं मयि रमसे।**

ततश्च **हे हरे - यदवशिष्टं मे किञ्चिद् वाम्यमासीत्तदपि हरसि।**

ततश्च **हे राम - मां रमयसि स्वस्मिन् पुरुषायितामपि करोषि।**

ततश्च **हे राम - रमणीयचूडामणे! तव नवीनवक त्रमाधुर्यमपि निःशंकं तदात्मानं तव रामणीयकं मन्नयनाभ्यां द्वाभ्यामेवाऽऽस्वाद्यते इति भावः।**

ततश्च **हे राम - रमणं रमः, रमस्य भावः रामः हे राम! तदा त्वं साक्षाद् रमणाधिदेवभावरूपोऽप्राकृतकन्दर्प एव भवसि, अथवा न केवलं रमणरूपेणापि रमणकर्तुरमणप्रयोजकः किन्तु तद्भावरूपा रतिमूर्तिरिव त्वं भवसीति भावः।**

ततश्च **हे हरे- मच्चेतनामृगीमपि हरसि, मामानन्दमूर्च्छितां करोषीति भावः।**

यता **हे हरे - सिंहस्वरूप! तदापि त्वं रतिकर्मणि सिंह इव महाप्रागल्भ्यं प्रकटयसीति भावः।**

**एवंभूतेन त्वया प्रेयसा वियुक्त ताऽहक्षणमपि कल्पकोटिमिव यापयितुं कथं प्रभावामीति स्वयमेव विचारय इति नाम षोडशकस्याऽभिप्रायः। ततश्च नामभिश्चुम्बकैरिव कृष्णः कृष्णया सहसैवाऽऽकृष्टो मिलितपरमानन्द एव। तस्याः स्वसखीनां तत्परिवारवर्गस्य तद्भावसाधकानामर्वाचीनानामपि श्रीराधाकृष्णौ मानसं संपूरयतः।**

इति श्रीरघुनाथदासगोस्वामिविरचिता 'महामंत्र'-व्याख्या समाप्ता।

## श्रीसच्चिदान्दभक्ति तविनोदठक्कुरकृता 'महामंत्र' व्याख्या-

**हे हरे - मच्चित्तं हृत्वा भवबन्धान्मोचय।** हे हरे! माझ्या चित्ताचे हरण करून, मला भवबंधनातून विमुक्त तकरा.

**हे कृष्ण - मच्चित्तमाकर्ष।** हे कृष्ण! माझ्या चंचल चित्ताला आपल्याकडे आकर्षित कर.

**हे हरे - स्वमाधुर्येण मच्चित्तं हर।** हे हरे! आपल्या स्वाभाविक माधुर्याने माझे चित्त हरण कर.

**हे कृष्ण - स्वभक्त तद्वाराभजनज्ञानदानेन मच्चित्तं शोधय।** हे कृष्ण! भक्ति क्ति ततत्वेत्ता आपल्या भ क्तां तांच्याद्वारे आपल्या भजनाचे ज्ञान देऊन माझ्या चित्ताला शुध्द बनव.

**हे कृष्ण - नामरूपगुणलीलादिषु मन्निष्ठां कुरु।** हे कृष्ण! आपल्या नाम-रूप-गुण-लीला आदिंमध्ये माझी निष्ठा बनव.

**हे कृष्ण - रुचिर्भवतु मे।** हे कृष्ण! आपल्या नाम-रूप-गुण-लीला इत्यादिंमध्ये माझी रुचि उत्पन्न होवो.

**हे हरे - निजसेवायोग्यं मां कुरु।** हे हरे! मला आपल्या सेवेच्या योग्य बनव.

**हे हरे स्वसेवामादेशय** - हे हरे! मला सेवेच्या योग्य बनवून आपल्या सेवेचा आदेश द्या.

**हे हरे - स्वप्रेष्ठेन सह स्वाभीष्टलीलां श्रावय।** हे हरे आपल्या प्रियतम भक्त तांच्यासोबत मला आपल्या अभीष्ट लीला ऐकव.

**हे राम - प्रेष्ठया सह स्वाभीष्टलीलां मां श्रावय!** हे राम! हे राधिकारमण! आपल्या स्वतःची प्रियतमा श्रीराधिकेसोबत गोलोकात श्रीराधिकेच्या सभेमध्ये मधुकंठ आणि स्निग्धकंठ द्वारे मला आपली अभीष्ट लीला ऐकव.

**हे हरे - स्वप्रेष्ठेन सह स्वाभीष्टलीलां मां दर्शय।**हे हरे! हे श्रीमती राधिके! तु मला आपल्या प्रियतम श्रीकृष्णासोबत आपल्या अभीष्ट लीलांचे दर्शन करव.

**हे राम - प्रेष्ठया सह स्वाभीष्टलीलां मां दर्शय।** हे राम। हे राधिकारमण! आपल्या प्रियतमेसोबत आपल्या अभीष्ट लीलांचे दर्शन करव.

**हे राम - नामरूपगुणलीलास्मरणादिषु मां योजय।** हे राम! अंतरंगभक्त तांच्यासोबतक्रीडा करणाऱ्या कृष्ण! मला कृपया आपल्या नाम, रूप, गुण, लीला आणि स्मरण इत्यादि मध्ये नियुक्त तकर.

**हे राम - तत्र मां निजसेवायोग्यं कुरु।** हे राम! अंतरंगभक्तांना सुख देण्याऱ्या श्याम! आपण मला आपल्या नाम, रूप, गुण, लीला, स्मरण इत्यादीमध्ये वेळेनुसार आपल्या सेवेच्या योग्य बनव.

**हे हरे- मां स्वाङ्गीकृत्य रमस्व।** हे हरे! मला दीन-हीन-मलिनजनाला अंगीकार करून माझ्या सोबत पण यथायोग्य क्रीडा कर.

**हे हरे- मया सह रमस्व!**हे हरे! माझ्यासोबत विशुध्द क्रीडा करावी. आपल्या श्रीचरणी माझी हीच विनम्र प्रार्थना आहे.

इति श्रीसच्चिदानन्दभक्ति तविनोदठक्कुरविरचितश्रीचैतन्यशिक्षामृतादुध्दृता
'महामंत्र' व्याख्या समाप्ता।



# पदकल्पतरुमध्ये 'महामंत्राची' व्याख्या

*नर हरिनाम अन्तरे अछ भावह*
*हबे भवसागरे पार ।*
*धर रे श्रवणे नर हरिनाम सादरे*
*चिन्तामणि उह सार ॥*
*यदि कृत-पापि आदरे कभु मंत्रक-*
*राज श्रवणे करे पान ।*
*श्री कृष्णचैतन्य बले हय तछु दुर्गम*
*पाप ताप सह त्राण ॥*
*करह गौर-गुरु-वैष्णव-आश्रय*
*लह नर हरिनाम-हार ।*
*संसारे नाम लइ इसुकृति हइया तरे*
*आपामर दुराचार ॥*
*इथे कृत-विषय-तृष्ण पहुँ-नाम-हारा*
*यो धारणे श्रम-भार ।*
*कुतृष्ण जगदानन्द कृत-कल्मष*
*कुमति रहल कारागार ॥*

( पदकल्पतरु। गौरपदतरङिणी तरंग १, उच्छवास २, पद ५९, पृष्ठ १५)

| | १ | | | | ३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नर | ह | रि–नाम अन्त | रे | अछु भावह | ह | बे भवसाग | रे | पार। |
| धर | रे | श्रवणे नर | ह | रि–नाम साद | रे | चिन्तामणि उ | ह | सार।। |
| यदि | कृ | त–पापि आद | रे | कभु मंत्रक– | रा | ज श्रवणे क | रे | पान। |
| श्रीकृ | ष्ण | चैतन्य बले | ह | य तछु दुर्ग | म | पाप ताप स | ह | त्राण।। |
| कर | ह | गौर–गुरु– वै | ष्ण | व आश्रय ल | ह | नर हरिना | म | हार। |
| संसा | रे | नाम लइ सु | कृ | ति हइया त | रे | आपामर दु | रा | चार।। |
| इथे | कृ | त–विषय– तृ | ष्ण | पहुँ–नाम–हा | रा | यो धारणे श्र | म | भार। |
| कुतृ | ष्ण | जगदानन्द | कृ | त–कल्मष कु | म | ति रहल का | रा | गार।। |
| | | | २ | | | | ४ | |

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे।।

# श्रीहरिनामाचे माहात्म्य

शास्त्रांत श्रीभगवन्नामाच्या महिमेचे प्रचुर वर्णन मिळते. इथे त्यातील काहीला उध्दृत केले जात आहे -

नामाचे स्वरूप

**नाम चिन्तामणिः कृष्णश्चैतन्य-रस-विग्रहः।**
**पूर्णः शुध्दो नित्य-मुक तोऽभिन्नत्वान्नामनामिनोः ॥१॥**

( भक्ति तरसाम्रासिंधु पूर्व विभाग २, लहरी १०८)

'कृष्णनाम' चिंतामणिस्वरूप आणि स्वयं कृष्ण चैतन्य-रस-विग्रह, पूर्ण, मायातीत आणि नित्यमुक तआहे, कारण नाम आणि नामीत भेद नाही आहे. ॥१॥

कलियुगात नामच सर्वसिध्दिदाता आहे-

**कलेर्दोषनिधे राजन्नस्ति ह्येको महान् गुणः।**
**कीर्तनादेव कृष्णस्य मुक तसङ्गः परं व्रजेत्॥२॥**

हे राजन्! कलियुग दोषराशिंचा खजिना आहे, परंतु त्यात एक फार मोठा गुण आहे. तो गुण हा आहे की कलियुगात भगवान श्रीकृष्णाचे संकीर्तन केल्यानेच



समस्त आसक्ति तसुटतात आणि भगवंताची प्राप्ति होते. ॥२॥

**कृते यद्ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः।**
**द्वापरे परिचर्यायां कलौ तध्दरिकीर्तनात् ॥३॥**

(श्रीमद्भागवत १२/३/५१-५२)

सत्ययुगात भगवंताच्य ध्यानाद्वारे, त्रेतायुगात मोठ-मोठ्या यज्ञांद्वारे त्यांची आराधना केल्याने आणि द्वापरयुगात विधिपूर्वक त्यांची पूजेद्वारे जे फळ मिळते, ते कलियुगात केवळ भगवन्नामाचे कीर्तन केल्याने अनासायच प्राप्त होते. ॥३॥

**ध्यायन् कृते यजन् यज्ञैस्त्रेतायां द्वापरेऽर्चयन्।**
**यद् आप्नोति तदाप्नोति कलौ संकीर्त्य केशवम्॥४॥**

(पाद्मोत्तर खण्डात ४२ अध्याय)

सत्ययुगात ध्यानाच्या द्वारे, त्रेतायुगात यज्ञांचे अनुष्ठान केल्याने आणि द्वापरयुगात परिचर्येद्वारे जे फळ प्राप्त होते, कलियुगात एकमात्र हरिनाम-कीर्तन केल्यानेच ते फळ प्राप्त होते॥४॥

कलिकाले नामरूपे कृष्ण अवतार।
नाम हैते हय सर्व जगत्-निस्तार॥
नाम बिना कलिकाले नाहि आर धर्म।
सर्व-मन्त्र-सार नाम ए शास्त्र-मर्म॥५॥

(चै. च. आ. १७/२२, ७/७४)

कलियुगात श्रीकृष्णच नामरूपात अवतरित झाले आहेत. नामानेच समस्त जगताचा उध्दार होतो. कलियुगात नामाविना साधन व्यर्थ आहेत. समस्त मंत्रांचे सार हरिनाम आहे, सगळे शास्त्र असेच सांगतात. ॥५॥

नाम-माहात्म्य-वर्णनात प्राचीन आचार्यवृंद-

**अंहः संहरतेऽखिलं सकृदुदयादेव-सकल-लोकस्य।**
**तरणिरिव तिमिर-जलधिं जयति जगन्मङ्गलं हरेर्नाम॥६॥**

(पद्यावली १६ संख्याधृत श्रीधरस्वामीकृत श्लोक)

जगन्मंगल हरिनाम विजयी होवो. ज्या प्रकारे सूर्य उदित होऊन अंधकाराचा विनाश करतो, त्याच प्रकारे हरिनाम फक्त तएकदाच उदित झाल्यावर लोकांच्या समस्त पापांचे नाश करते.॥६॥

**आकृष्टिः कृतचेतसां सुमनसामुच्चाटनं चांहसा-**
**माचण्डालममूकलोकसुलभो वश्यश्च मुक्ति तश्रियः।**

**नो दीक्षां न च सत्क्रियां न च पुरश्चर्यां मनागीक्षते**
**मन्त्रोऽयं रसनास्पृगेव फलति श्रीकृष्णनामात्मकः॥७॥**

(पद्यावली १८)

त्रिगुणातीत मुक्तकुलांचे चित्त आकर्षकस्वरूप, चाण्डाळापासून वाक्-शक्तिमान व्यक्तिपर्यंत सुलभ, मुक्तिरूपऐश्वर्याला वश करणारा, असा श्रीकृष्णनामस्वरूप 'महामंत्र' जिव्हेवर स्पर्श होताच फळ प्रदान करतो, दीक्षादि सत्कार्य अथवा पुरश्चरण (मंत्रोच्चारण) या सगळ्यांची किंचितमात्र पण अपेक्षा करत नाही.॥७॥

ब्रह्म साक्षात्कारापेक्षा नामोच्चारणाची महिमा अधिक आहे-

**यद्ब्रह्म-साक्षात्-कृति-निष्ठयापि विनाशमायाति विना न भोगैः।**
**अपैति नाम स्फुरणेन तत् ते प्रारब्ध कर्मेति विरौति वेदः॥८॥**

(श्रीरूपगोस्वामीकृत श्रीकृष्णनाम स्तोत्र ४ श्लोक)

हे नाम प्रभो! अवच्छिन्न तैलधारावत् ब्रह्म चिंतनाद्वारा ब्रम्ह-साक्षात्काराची निष्ठा प्राप्त झाल्यावर सुद्धा ज्या प्रारब्ध कर्माला भोगावेच लागते, ते प्रारब्ध कर्म केवळ आपल्या स्फूर्तिनेच अर्थात भक्तांच्याजिव्हेवर केवळ उच्चारण झाल्यानेच विनष्ट होते. या गोष्टीला वेद उच्च स्वरात परत-परत सांगतात. ॥८॥

नामकीर्तनाची श्रेष्ठता-

**अघच्छित्-स्मरणं विष्णोर्बह्वायासेन साध्यते।**
**ओष्ठस्पन्दनमात्रेण कीर्त्तनस्तु ततो वरम्॥९॥**

(हरि-भक्तिविलास ११/२३६ वैष्णव चिंतामणिवाक्य)

विष्णुचे स्मरण पापोच्छेदक असले तरी ते प्रचुर यत्नाद्वारेच पूर्ण होते. परंतु ओठांच्या केवळ स्पंदनानेच (अनासायच) जे कीर्तन होते, ते स्मरणापेक्षा ही श्रेष्ठ आहे. (कारण या प्रकारे नामकीर्तन अथवा नामाभासाच्या द्वारेच संसार बंधनातून मुक्त होणे शक्य आहे). ॥९॥

ध्यान-पूजादिपेक्षा नामकीर्तनाची श्रेष्ठता-

**जयति जयति नामानन्दरूपं मुरारेर्विरमितनिजधर्मध्यानपूजादियत्नम्।**
**कथमपि सकृदात्तं मुक्तिदंप्राणिनां यत् परमममृतमेकं जीवनं भूषणं मे ॥१०।**

(श्रीबृहद्भागवतामृतम् १।१।९ श्रील सनातन गोस्वामी)

ज्याच्या द्वारे निजधर्म, ध्यान आणि पूजादि चेष्टांचा अंत होतो, अश्या आनंदस्वरूप मुरारीच्या नामाचा जय हो, जय हो. हे नाम ज्या कोणत्याही प्रकारे



घेतल्यावर (केवळ नामाभासानेच) जीवांना मुक्तिप्रदान करते आणि हे एकमात्र परम अमृतस्वरूप आहे, हे माझे जीवन आणि भूषण आहे ॥१०॥

**येन जन्म-शतैः पूर्वं वासुदेवः समर्चितः।**
**तन्मुखे हरिनामानि सदा तिष्ठन्ति भारत॥११॥**

(हरि-भक्तिविलास ११। २३७ शास्त्रवाक्य)

हे भरतवंश श्रेष्ठ! ज्यांनी शत-शत वर्ष पूर्व जन्मांमांत उचित (सम्यक) रूपाने वासुदेवाचे अर्चन केले आहे, त्यांच्या मुखातच श्रीहरिचे नाम नित्यकाळ विराजमान असते ॥११॥

नामात देशकाल आदिचा नियम नाही आहे -

**न देशनियमो राजन् न कालनियमस्तथा।**
**विद्यते नात्र सन्देहो विष्णोर्नामानुकीर्त्तने॥१२॥**
**कालोऽस्ति दाने यज्ञे च स्नाने कालोऽस्ति सज्जपे।**
**विष्णुः संकीर्तने कालो नास्त्यत्र पृथिवीतले॥१३॥**

(हरि-भक्तिविलास ११ विलास २०६ संख्याधृत वैष्णव चिंतामणि वाक्य)

हे राजन्! विष्णुच्या नाम कीर्तनाच्या विषयात कोणत्याही देश अथवा काळाचा नियम नाही आहे, असे निसंदेहपूर्वक सांगितले जाते. दान यज्ञ आणि अन्यान्या जपात काळ-नियमाचा विचार आहे, परंतु या पृथ्वीवर विष्णु नामाच्या संकीर्तनात कोणत्याही काळ आणि नियमाचे विधान नाही आहे॥१२-१३॥

**न देशनियमस्तस्मिन् न कालनियमस्तथा।**
**नोच्चिष्टादौ निषेधोऽस्ति श्रीहरेर्नाम्निलुब्धक ॥१४॥**

(हरि-भक्तिविलास ११ विलास २०२ संख्याधृत विष्णुधर्मोत्तरवाक्य)

हे लुब्धक (हे लोभी व्यक्ति)! श्रीहरिच्या नाम-कीर्तनाच्या विषयात देश आणि काळाचा नियम नाही आहे. उच्छिष्ट मुखाने किंवा कश्याही प्रकारे अशुचि अवस्थेत पण नामकीर्तन करणे निषिध्द नाही आहे. ॥१४॥

**मधुर-मधुरमेतन्मङ्गलं मङ्गलानां सकलनिगमवल्ली-सत्फलं चित्स्वरूपम्**
**सकृदपि परिगीतं श्रध्दया हेलया वा भृगुवर नरमात्रं तारयेत् कृष्ण नाम॥१५॥**

(हरि-भक्तिविलास ११ विलास २३४ संख्याधृत स्कंदपुराण वाक्य)

हरिनाम सर्व प्रकारच्या मंगलात श्रेष्ठ मंगल-स्वरूप आहे, मधुरात ही सुमधुर आहे. ते सर्व श्रृति-लतांचे चिन्मय सुपक्वफळ आहे. हे भार्गवश्रेष्ठ! श्रध्देने असो अथवा अवहेलनेद्वारा, मनुष्य जर स्पष्ट रूपाने एकदा जरी निरपराध होवून 'कृष्ण'

नामाचे उच्चारण करेल, तर ते नाम त्यान्याच क्षणी मनुष्याला तारते॥ १५॥

सर्वांसाठी 'नामसंकीर्तन' साधन आणि साध्य आहे-

**एतन्निर्विद्यमानानामिच्छतामकु तोभयम्।**
**योगिनां नृप निर्णीतं हरेर्नामानुकीर्तनम्॥१६॥**

(श्रीमद्भागवत २।१।११)

हे राजन्! निर्वेद (वैराग्य) प्राप्त, ऐकान्तिक भक्त स्वर्ग आणि मोक्ष इत्यादिंची अभिलाषा ठेवण्याः या आणि आत्माराम योगी सर्वांसाठी श्रीहरिच्या नावाचे पुनः पुनः कीर्तन तथा स्मरण करणेच परम साधन आणि साध्य आहे. पूर्ववर्ती आचार्यांनी अश्याच स्थिर सिध्दांताची घोषणा केली आहे. ॥१६॥

# हरिनाम

भव-समुद्र फारच दुस्तर आहे. परमेश्वराच्या कृपेशिवाय त्याला पार करणे कठीणच नाही, असंभव आहे. जीव जडापेक्षा श्रेष्ठ असूनसुध्दा स्वभावतः दुर्बळ आणि पराधीन आहे. भगवंत च जीवांचे एकमात्र रक्षक, पालक आणि त्राता आहेत. जीव अणु-चैतन्य आहे, अतएव परम चैतन्य भगवंताच्या अधीन आणि सेवक आहेत. परम चैतन्य परमेश्वरच जीवांचा आश्रय आहे. हे जड-जगत मायेद्वारे रचित आहे. या जड-जगतात जीवांची स्थिति ठीक त्या प्रकारे आहे, जशी अपराधी व्यक्ति तची स्थितिकारागृहात असते. भगवंताच्या विमुख झाल्यामुळे जीव मायेच्या संसारात चक्कर काटतो आहे. भगवद्-विमुख जीवांना बध्दजीव म्हटले जाते; कारण ते मायेद्वारे बांधले आहेत. याच्या विपरीत जे जीव भगवंताचे अनुगत आहेत, ते मायेतून मुक्तझाले आहेत. अशा जीवांना मुक्त जीव म्हणतात. अशाप्रकारे अवस्था भेदाद्वारे अनन्त जीव दोन भागात विभक्त आहेत - बध्द जीव आणि मुक्तजीव.

बध्द जीव साधनाद्वारे भगवंतांची कृपा प्राप्त करून, मायेच्या सुदृढ रज्जुला तोडण्यास समर्थ आहेत. आमच्या महामहिम महर्षिंनी अनेक प्रकारच्या शोध केल्या नंतर तीन प्रकारचे साधन स्थिर केले आहेत - कर्म, ज्ञान आणि भक्ति



वर्णाश्रमधर्म, यज्ञ, तपस्या, दान, व्रत, योग - यांना शास्त्रांत कर्मांग म्हटले जाते. या विभिन्न कर्मांचे भिन्न-भिन्न फळ पण त्या शास्त्रांत सांगितले आहेत. त्या फळांवर पृथक-पृथक विचार केल्यावर माहीत होते की स्वर्ग-भोग, मृत्युलोकाचा भोग, रोगशांति आणि उच्च कर्म करण्याच्याच्या सुअवसराची प्राप्ति - हेच त्यांचे प्रधान फळ आहेत. त्यात उच्च कर्म करण्याच्या सुअवराच्या प्राप्तिरूप फळाला पृथक करून टाकल्यावर उरलेले समस्त प्रकारचे फळ मायिक प्रतीत होतात . स्वर्ग-भोग, मर्त्यसुखभोग, ऐश्वर्य आदि फळ- ज्यांना जीव कर्मांद्वारे प्राप्त करतो - सर्व नश्वर आहेत. हे सर्व भगवंतांच्या काळचक्रात पडल्यावर विनष्ट होऊन जातात. या फळांच्याद्वारे मायेचे बंधन खूलणे तर दूरच राहिले, त्याने अजून अधिक कर्म वासना उत्पन्न होतात. ज्या माया-बंधनाला पुर्वीपेक्षाही अधिक सुदृढ करतात. उच्च कर्मांचा सुयोगरूप फळपण निरर्थकच होते, जर उच्च कर्म खरोखर केले नाही. श्रीमद्भागवतात अश्या प्रकारे म्हटले आहे-

**धर्मः स्वनुष्ठितः पुंसां विष्वक्सेन-कथासु यः।**
**नोत्पादयेद् यदि रतिं श्रम एव हि केवलम्॥**

(श्रीमद्भागवतम् १।५।१२)

वर्णाश्रम धर्माचे मूळ तात्पर्य आहे की स्वभावाच्या अनूसार सांसारिक आणि शारीरिक कर्मांच्या विभागाद्वारे मनुष्य सहजपणे संसार आणि शरीर-यात्रेचा निर्वाह करू शकेल. असे केल्याने हरिकथेच्या अनुशीलनासाठी पर्याप्त वेळ मिळेल. जर कोणी मनुष्याने वर्णाश्रम धर्माचे उत्तम रूपात पालन तर केले, परंतु हरि-कथेत त्याला रुचि झाली नसेल, तर त्याचे सारे धर्मानुष्ठान व्यर्थ परिश्रमच ठरतो. कर्माद्वारे निश्चितपणे भवसमुद्र पार केल्या जाऊ शकत नाही-याला मी संक्षेपात सांगितले.

ज्ञानालापण उच्च गति प्राप्त करण्याचे साधन सांगितले आहे. ज्ञानाचे फळ आत्मशुध्दि आहे. परंतु या तत्त्वाला विसरून जीव जडाश्रित होवून कर्म मार्गात भटकत असतो. ज्ञानचर्चेद्वारे हे जाणता येते की मी जड (निर्जीव) नाही - चिद्-वस्तु आहे. असे ज्ञान स्वभावतः 'नैष्कर्म्य' म्हणून ओळखले जाते. याचे कारण आहे की यात चिद्-वस्तुचे थोडेसे ज्ञान शिल्लक राहिल्यावर चिद्वस्तुचा नित्यधर्म-जो चिदास्वादन आहे, प्रारंभ होत नाही. या अवस्थेला पोहोचलेले जीव

आत्माराम म्हणून ओळखले जातात. परंतु जेंव्हा चिदास्वादनरूप चित्क्रिया प्रारंभ होते, तेंव्हा नैष्कर्म्य उरत नाही. म्हणून देवर्षि नारदांनी सांगितले आहे-

**नैष्कर्म्यमप्यच्युत भाववर्जितं**

**न शोभते ज्ञानमलं निरञ्जनम्**

(श्रीमद्भागवतम् १।७।१०)

अर्थात नैष्कर्म्य निर्मल ज्ञान पण भगवंताच्या भक्ति तेनस्निग्ध न झाल्यास नितांत उपेक्षणीय असते.

श्रीमद्भागवतात पण सांगितले आहे की-

**आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रन्थाऽअप्युरुक्रमे।**

**कुर्वन्त्यहैतुकीं भक्ति तमित्थम्भूतगुणो हरिः॥**

परम चैतन्य हरिमध्ये एक असा असाधारण गुण आहे, जो समस्त जडमुक तआत्माराम जीवांना पण आकर्षित करून आपल्या भक्ति त्त नियुक त करतो.

म्हणून कर्म उच्च कर्माचा सुअवसर प्रदान करून आणि ज्ञान आपले नैष्कर्म्य-स्वरूप परित्याग करून जेंव्हा भक्ति तसाधन करण्यातनियुक तहोते, तेंव्हा कर्म आणि ज्ञानाला साधन-अंग म्हटले जाते. त्यांची स्वयं कोणतीही साधन-अंगता स्वीकृत नाही आहे. म्हणून केवळ भक्ति तलाच साधनम्हटले गेले आहे. कर्म आणि ज्ञान भक्ति तच्याअधीन झाल्यावर कधी-कधी साधनाच्या रूपात मानले जाते, परंतु भक्ति त स्वभावतःच साधन-स्वरूप आहे. याविषयात श्रीमद्भागवताचा निर्णय स्पष्ट आहे-

**न साधयति मां योगो न साङ्ख्यं धर्म उध्दव।**

**न स्वाध्यायस्तपस्त्यागो यथा भक्ति तर्ममोर्जिता॥**

हे उध्दव! कर्मयोग, सांख्ययोग, वर्णाश्रम धर्म, वेद-पाठ, तपस्या वा वैराग्य मला प्रसन्न करू शकत नाही, केवळ भक्ति तच मला प्रसन्न करण्यास समर्थ आहे. भगवंताना प्रसन्न करण्यासाठी भक्ति तच्याअतिरिक तआणि कोणताही उपाय नाही. साधन भक्ति तनऊ प्रकारची आहे- श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन. त्यातील श्रवण, कीर्तन आणि स्मरण - हे तीन प्रधान साधनांग आहेत. भगवंताचे नाम, रूप, गुण आणि लीला - या चार विषयांचेच श्रवण, कीर्तन आणि स्मरण होते. यातील पण



श्रीनामच आदि आणि सर्व बीज-स्वरूप आहे. म्हणून हरिनामच सर्व प्रकारच्या उपासनांचे मूळ आहे. शास्त्रांत सांगितले आहे की -

**हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नामैव केवलम्।**

**कलौ नास्तेव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा॥**

(श्री-बृहन्नारदीयपुराण ३।८।१२६)

कलियुगात हरिनामाच्या अतिरिक त जीवांचीदूसरी गति नाही आहे. ' कलिकाल' शब्दाद्वारे हे समजले जाते की सर्व काळ हरिनामाविना जीवांची गति नाही आहे. विशेष करून कलियुगात इतर मंत्रांची साधन दुर्बळ झाल्या कारणाने केवळ हरिनामाचे अवलंबन करणे उचित आहे, कारण हरिनाम सर्वात श्रेष्ठ वीर्यशाली आहे.

हरिनामाच्या संबंधी पद्मपुराणात या प्रकारे लिहिलेले आहे-

**नाम चिन्तामणिः कृष्णश्चैतन्यरसविग्रहः।**

**पूर्णः शुध्दो नित्यमुक तोऽभिन्नत्वान्नामनामिनोः॥**

श्रीजीव गोस्वामी या श्लोकाची व्याख्या करतान लिहितात-

**एकमेव सच्चिदानन्द-रसादिरूपं तत्वं द्विधाविर्भूतमित्यर्थः।**

श्रीकृष्णततत्व अद्वय सच्चिदानंद स्वरूप आहे. त्याचा दोन रूपांत आविर्भाव होतो- १. नामीच्या रूपात श्रीकृष्णविग्रह आणि २. नामाच्या रूपात श्रीकृष्णनाम. याचे मूलतत्त्व हे आहे की श्रीकृष्ण सर्वशक्ति तमान ओह्र. शक्ति तमान पुरुषाचे समस्त प्रकाशच त्यांच्या शक्ति तचे प्रकाश ओह शक्ति त्त आपल्या आधाररूप पुरुषाला इतरांच्या निकट प्रकाशित करते. शक्ति तच्यादर्शन-प्रभावाद्वारे कृष्णरूप प्रकाशित होते आणि आह्वय-प्रभावाद्वारा कृष्णनाम विज्ञापित होते. म्हणून कृष्णनाम चिंतामणि-स्वरूप, कृष्ण-स्वरूप आणि चैतन्य-रस-स्वरूप आहे. नाम सर्वदा पूर्णस्वरूप आहे अर्थात त्यात विभक्ति तंच्यायोगाने 'कृष्णाय नारायणाय' इत्यादि मंत्रादि निर्माणाची अपेक्षा नसते. कृष्णनाम उच्चारित होताच चित्ततत्वात कृष्ण-रस अकस्मात् उदित होतो. नाम केवळ चैतन्य रसमात्र आहे. नाम सर्वदा मुक तअसतात, म्हणून सर्वदा नित्यमुक तअसतात, ते कधीही जड जिव्हा इत्यादिपासून उत्पन्न होत नाही. ज्यांनी नाम-रसाचे पान केले आहे, तेच केवळ या व्याख्येला समजण्यास समर्थ होऊ शकतात. जे नामात जडत्वाची कल्पना करतात, स्वयं चैतन्यरसास्वादन करण्यास आहेत, ते या व्याख्येने संतुष्ट होऊ शकत नाही. जर असे म्हणाल की आम्ही निरंतर जे नाम-उच्चारण करतो,

ते जडीय (निर्जीव) अक्षरांच्या द्वारे होते; अशा दशेत नामाला जडातून (निर्जीवातून) उत्पन्न वस्तु न म्हणून नित्य मुक्तकसे म्हटले जाते? या बहिर्मुख तर्कार्काच्या उत्तरात श्रीरूप गोस्वामी म्हणतात -

**अतः श्रीकृष्णनामादि न भवेद् ग्राह्यमिन्द्रियैः।**

**सेवोन्मुखे हि जिह्वादौ स्वयमेव स्फुरत्यदः॥**

(श्रीभक्ति तरसामृतसिन्धु)

प्राकृत वस्तुच प्राकृत इंद्रिय-ग्राह्य असते. कृष्णनाम अप्राकृत आहे. म्हणूते ते कदापि प्राकृत इंद्रियग्राह्य नाही. जेंव्हा ते नाम जीभेद्वारे प्रकाशित होते, ते केवळ आत्म्याच्या अप्राकृत आनंदाची तदुपयोगी इंद्रियात स्फूर्ति मात्र आहे. भक्त तजेंव्हा आत्म्याच्या अप्राकृत रसनेद्वारे (जीभेद्वारे) कृष्णनाम उच्चारण करतात, त्यावेळी ते उच्चरित परमतत्त्व प्राकृत रसनेवर (जीभेवर) आविर्भूत होऊन नृत्य करू लागते. आनंदाने हास्य, स्नेहाने क्रंदन, प्रीतिने नृत्य ज्या प्रकारे अप्राकृत रसाच्या इंद्रियापर्यंत व्याप्त होतात, त्याच प्रकारे श्रीकृष्णनाम-रसाची जीभेपर्यंत व्याप्ति असते. प्राकृत रसनेद्वारे कृष्णनाम उत्पन्न होत नाही. साधन काळात ज्या नामाचा अभ्यास केला जातो, ते यथार्थ नाम नाही आहे. त्याला छायानाम अथवा नामाभास म्हटले जाऊ शकते. नामाभास करता-करता क्रमोन्नति द्वारा बहुधा अप्राकृत नामात रुचि होताना पाहिली जाते. वाल्मीकि आणि अजामिलचे जीवन-चरित्र या विषयात ज्वलंत दृष्टांत आहेत.

जीवाची नामात रुचि न होण्याचे कारण अपराध आहे. जे अपराध-रहित होऊन कृष्णनाम ग्रहण करतात, त्यांच्या हृदयात चैतन्यरस-विग्रहरूप अप्राकृत श्रीहरिनामाचा उदय होतो. अप्राकृत नामाचा उदय झाल्यावर हृदय प्रफुल्लित होते, डोळ्यातून अश्रुधारा-प्रवाहित होऊ लागतात आणि शरीरात सात्विक विकार उत्पन्न होऊ लागतात. म्हणून श्रीमद्भागवतात असे सांगितले आहे-

**तदश्मसारं हृदयं वतेदं यद्गृह्यमाणैर्हरिनामधेयैः।**

**न विक्रियेताथ यदा विकारो नेत्रे जलं गात्ररुहेषु हर्षः॥**

जीव ज्यावेळी हरिनाम ग्रहण करेल, त्या वेळी त्याचे हृदय निश्चित रूपाने विकृत होईल, डोळ्यात निश्चितच अश्रुधारा प्रवाहित होतील आणि शरीरात अवश्यच रोमांच होतील. जे कृष्णनामाचे उच्चारण तर करतात, परंतु ज्यांच्यांत



असे विक्कार दिसत नाहीत . त्यांचे हृदय अपराधामूळे अतिशय कठोर झालेले आहे - असे समजले पाहिजे.

निरपराध होऊन हरिनाम घेणे साधकाचे नितांत कर्तव्य आहे. म्हणून अपराधापासून वाचण्यासाठी अपराध किती प्रकारचे आहेत, याचे ज्ञान होणे आवश्यक आहे.

शास्त्रांत हरिनामाच्या संबंधी दहा प्रकारच्या अपराधांचा उल्लेख आहे- (१) साधु-निंदा (२) शिव आदि देवतांना भगवंताहून वेगळे स्वतंत्र मानणे. (३) गुरुची अवज्ञा करणे. (४) वेदादि सत्-शास्त्रांची निंदा करणे. (५) हरिनाम-माहात्म्याला केवळमात्र प्रशंसा समजणे. (६) हरिनामात अर्थ कल्पना अर्थात कृष्ण, राम, आदि नाम कल्पित आहेत, अशी धारणा ठेवणे. (७) नामाच्या बळावर पाप करणे. (८) इतर शुभ कर्मांना हरिनामासमान समजणे. (९) अश्रध्दाळू व्यक्ति तंनाहरिनामाचा उपदेश करणे. (१०) नामाचे माहात्म्य श्रवण करून सुध्दा त्याच्या प्रति अविश्वास करणे.

साधुभक्त तांच्या प्रतिअश्रध्दा प्रकाश केल्याने आणि साधु-चरित्र महाजनांची निंदा केल्याने हरिनामाच्या प्रति अपराध होतो. म्हणून जे हरिनामाचा आश्रय ग्रहण करतील, त्यांना सर्वप्रथम वैष्णव-अवज्ञेच्या प्रवृत्तिचा सर्वतोभावेन परित्याग करायला हवा. वैष्णवांच्या कार्याप्रति संदेह (संशय) झाल्यास लगेचच निंदा न करता त्याचे तात्पर्य शोधायचा प्रयत्न करायला हवा. म्हणून साधुजनांवरती श्रध्दा करणेच कर्तव्य आहे.

शिव आदि देवतांना भगवंताहून पृथक् (वेगळे) समजणे नामापराध आहे. भगवत् तत्त्व एक आणि अद्वितिय आहे. शिव इत्यादि देवतांची भगवंतापेक्षा पृथक (वेगळी) कोणतीही सत्ता (अस्तित्व) नाही आहे. शिव इत्यादि देवतांना भगवंतांचे गुणावतार अथवा भगवद् भक्त मानून सम्मान केल्यास भेदज्ञान राहात नाही. जे लोक महादेवाला एक पृथक अर्थात स्वतंत्र देवता मानून शिव आणि विष्णुची पूजा करतात, ते महादेवाची भगवत्ता स्वीकार करत नाही. त्यामुळे ते विष्णु आणि शिव दोघांच्या प्रति अपराधी होतात. जे हरिनाम करतात, त्यांना या प्रकारच्या भेद-ज्ञानाचा भल्या-प्रकारे त्याग करायला हवा.

गुरुदेवांची अवज्ञा करणे एक नामापराध आहे. जे नाम-तत्त्वाच्या सर्वोत्तमतेची शिक्षा देतात, त्यांना आचार्यरूप भगवत्-प्रेष्ठ समजले पाहिजे. त्यांच्या प्रति दृढभक्ति करून हरिनामातअचला श्रध्दा प्राप्त करायला हवी.

कधीही सत्-शास्त्रांची निंदा करू नये. वेदादि शास्त्रांत भागवत धर्माचे वर्णन आहे - श्रीनामाचे खूपच माहात्म्य सांगितले आहे. त्या शास्त्रांची निंदा केल्याने हरिनामापराध होतो. वेद इत्यादि शास्त्रांत सर्वत्रच हरिनामाचे माहात्म्य सांगितले आहे-

**वेदे रामायणे चैव पुराणे भारते तथा।**
**आदावन्ते च मध्ये च हरिः सर्वत्र गीयते॥**

अशा प्रकारे सत् शास्त्रांची निंदा केल्याने हरिनामात कशा प्रकारे प्रीति होऊ शकेल?

काही लोक असे समजतात की वेद इत्यादि शास्त्रांत हरिनामाचे जे माहात्म्य वर्णन केले आहे, ते केवळ नामाची प्रशंसामात्र आहे. ज्यांची अशी धारणा आहे, ते नामापराधी आहेत. असे लोक हरिनाम करूनही हरिनामाचे वास्तविक फळ प्राप्त करत नाही. अशा लोकांची अशी समज असते की ज्या प्रकारे कर्मकांडात रुचि उत्पन्न करण्यासाठी कर्मकांडाची फुलवून प्रशंसा केली जाते, त्याच प्रकारे शास्त्रांत हरिनामाची पण वाढवून-चढवून फल-श्रुति दिली आहे. असे समजणारे फार दुर्दैवी आहेत. याच्या विपरीत भाग्यवान व्यक्ति तंचा विश्वास या प्रकारे असतो-

**एतन्निर्विद्यमानानामिच्छतामकु तोभयम्।**
**योगिनां नृप निर्णीतं हरेर्नामानुकीर्तनम्॥**

संसारातून वैराग्य प्राप्त सर्व प्रकारच्या भयातून सुटकारा प्राप्त करण्याची इच्छा ठेवण्याऱ या योगींनाहरिनामाचे कीर्तनच एकमात्र कर्तव्य आहे - असा विश्वास करणारा व्यक्ति तच हरिनामाचे वास्तविक फळप्राप्त करतो.

नामाभास आणि नामाचा भेद न समजून काही लोक असे समजतात की नाम अक्षरमय आहे. म्हणून श्रध्दा नसल्यावर पण नाम घेतल्याने फळच मिळेल. ते अजामिळाचे उदाहरण देतात आणि 'सांकेत्यं पारिहास्यं वा' आदि शास्त्र-वचनांचे उदाहरण प्रस्तुत करतात. ही गोष्ट तर पहिलेच सांगितली आहे की हरिनाम चैतन्यरसविग्रह आहे आणि प्राकृत इंद्रियग्राह्य नाही आहे. म्हणून निरापराध होऊन नामाश्रय न केल्यास नामाचा फलोदय संभव नाही. अश्रध्दाळु व्यक्ति तंच्यानामोच्चारणाचे फळ हे आहे की काही दिवसात त्यांची नाम्प्राप्रति श्रध्दा उत्पन्न होते. म्हणून अश्रध्दापूर्वक अर्थवाद करून (अतिशयोक्ति तसमजून) नामाला जडात्मक अक्षररूपात ते कर्मकांडाचे अंग समजतात आणि असाच प्रचार



करतात, ते नितांत बहिर्मुख आणि नामपराधी आहेत. वैष्णवजन या अपराधाचे यत्नपूर्वक वर्जन करतात.

काही लोक हरिनामश्रय करून असे समजतात की आम्ही आता समस्त प्रकारच्या पापांपासून मुक्त तहोण्यासाठी एक स्वस्त औषध प्राप्त केले आहे. या विश्वासासोबत ते ठग, वाटेमारी, डाकेमारी, चोरी अथवा बदमाशी इत्यादि पाप कर्म करून हरिनाम करतात, ज्याने त्यांचे सर्व पाप नष्ट होतील. असे समजणारे व्यक्ति तनामापराधी आहेत. जे व्यक्ति तनामाश्रय करतात, ते एकदा चिद्रसाचा आस्वादन करून नतंर कधीही जडीय असत् वस्तुत आसक्त त होतनाहीत.

काही लोकांचा विचार असा आहे की यज्ञ आदि कर्म, दानादि धर्म, आणि तीर्थ-यात्रादि कार्य- हे सगळे ज्या प्रकारे शुभकर आहेत, नामपण तशीच कोणती गोष्ट आहे. अशे व्यक्ति तनामापराधी आहेत. नाम सदा चिद्रसस्वरूप आहे. अन्यान्य समस्त सत्कर्मच जडमय आहे. म्हणून ते नामाच्या विजातीय आहेत. जे लोक या कर्मांना अथवा सत् कर्मांना नामाच्या समान समजतात, ते वास्तविकपणे नामरसाचा आस्वादन करू शकत नाही. ज्या प्रकारे हीरा आणि काचेत भेद आहे, ठीक त्याच प्रकारे हरिनाम आणि इतर-सम्ा याशुभ कर्मात वस्तुगत भेद आहे.

अश्रध्दाळू व्यक्ति तंना उपेद्वा अथवा मंत्र देणारे व्यक्ति तनामापराधी आहेत. ज्या प्रकारे डुकराला (वराहाला) मोती देऊन काही लाभ नाही, उलट मोत्यांचाच अपमान अथवा अवज्ञा होते, त्याचप्रकारे ज्या लोकांना हरिनामाच्या प्रति उपयुक्त तश्रध्देचा अभाव आहे, त्यांना नामोपदेश करणे नितांत अन्याय आहे. अश्या लोकांना हरिनामाच्या प्रति कश्या प्रकारे श्रध्दा होईल, याचा प्रयत्न करणे उचित आहे. श्रध्दा झाल्यानंतर नामोपदेश करणे उचित आहे. जे लोक आपल्याला गुरु अभिमान करून अपात्रालापण हरिनामाचा उपदेश करतात, ते नामापराधामुळे अधःपतित होतात.

हरिनामाचे माहात्म्य श्रवण करूनपण जे नामाच्या प्रति ऐकान्तिक श्रध्दा न करता अन्यान्य साधनांचा - कर्म, ज्ञान अथवा योग यांचा आश्रय त्याग करत नाही, तेपण नामापराधी आहेत.

या प्रकारे नामापराध वर्जन न केल्याने हरिनाम उदित होत नाही. कलियुग पावनावतारी श्रीश्रीचैतन्य महाप्रभुंनी संसारी जीवांच्या नाना प्रकारच्या दुःखाना पाहून दयार्द्रचित्ताने असा उपदेश केला आहे-

**तृणादपि सुनीचेन तरोरपि सहिष्णुना।**
**अमानिना मानदेन कीर्तनीयः सदा हरिः॥**


आपल्याला गवतापेक्षाही तुच्छ मानून, वृक्षापेक्षाही अधिक सहिष्णु बनून स्वयं अभिमान-शून्य आणि दूसर यालामान देणारे बनून जीव हरिनाम-संकीर्तनात अधिकार प्राप्त करतो. व्यवहार शुध्दिसोबत हरिनाम ग्रहण करण्याची व्यवस्था हीच या वाणीचे मुख्य तात्पर्य आहे. जे आपल्याला सर्वात अधिक दीन-हीन समजतात, ते कधीही साधुची निंदा, शिव इत्यादि देवतांत भेदबुध्दिद्वारा अवज्ञा, गुरुची अवज्ञा आणि सत्-शास्त्रांची निंदा करू शकत नाही आणि हरिनामाच्या माहात्म्याप्रति त्यांच्या हृदयात कधीही संदेह उत्पन्न होऊ शकत नाही. ते शुष्कज्ञानजात तर्कद्वारा 'हरि' शब्दात निर्गुण-ब्रह्मवादाची कल्पना करीत नाही, नामाच्या बलावर पाप-कर्म करीत नाही, दूसर या सत्कर्मसोबत हरिनामाला समान मानत नाही, अश्रध्दाळु व्यक्ति तंनाहरिनाम देत नाही आणि नामाच्या प्रति लवमात्रही अविश्वास ठेवत नाही. ते स्वभावतः दहा अपराधांपासून दूर राहण्याचा यत्न करतात. कोणीही उपहास केल्यावर अथवा अहित केल्यावरसुध्दा ते त्याचा उपकारच करतात. ते जगताचे समस्त कार्य केल्यावरसुध्दा स्वतः आपल्यात भोक ता अथवा कर्ताअसा अभिमान ठेवत नाही. ते आपल्याला जगताचे दास मानून जगताची सेवा करण्यात लागलेले असतात.

अशा अधिकारी व्यक्ति तंच्यामुखातून जेंव्हा हरिनाम उच्चारित होते, तेंव्हा अंतस्थित चिज्जगतातून वीजेप्रमाणे चित् ज्योति व्याप्त होऊन जगताच्या जीवांचा मायाविकाररूप अंधकार दूर करते. म्हणून, महात्माजन! अपराध-रहित होऊन निरंतर हरिनामाचे कीर्तन करा. हरिनामाच्या विना जीवांसाठी आणि कोणताही दूसरा आश्रय नाही. या दुस्तर भव-समुद्रात बुडत्या व्यक्ति तला ज्ञान अथवा कर्माचा आश्रय घेणे केवळ गवताचा आश्रय घेवून महासागर पार करण्याच्या इच्छेसमान सर्वथा निरर्थक आहे. म्हणून हरिनामरूप महापोताचा (मोठ्या जहाजाचा) आश्रय घेऊन या दुस्तर भव-समुद्राला पार करावे.


– जगद्गुरु श्रीभक्ति तविनोदठाकूर



–



त्रिदंडिस्वामी श्रीमद्भक्ति तेदांत नारायण गोस्वामी महाराज








2000 10 3

